डॉ. नितीन मोरे

तानाशाही अमर रहे



तानाशाही अमर रहे..

(दीर्घांक)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

तानाशाही अमर रहे..

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ,
वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- ३१ ऑगस्ट २०२६

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यतः आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे पासष्टावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

तानाशाही अमर रहे..

प्रस्तावना

हुकूम चालवणे मनुष्याचा उपजत स्वभाव असावा. त्याच्यामुळेच असावीत अशी छोटी छोटी हुकुमशाहीची बेटं आपण पूर्वीच्या काळी (किंवा कदाचित आजकालही) घराघरातून पाहिली आहेत. वयस्करांना वयानुसार तो हक्क मिळत असावा! पण विषय तो नाही. विविध क्षेत्रात हुकुमशाहीचे वेगवेगळे स्वरूप दिसत असले तरी याबाबतीत सर्वसमावेशक आहे ती राजकीय हुकुमशाही. जागतिक पातळीवर राजकीय हुकुमशाही ही काही तशी विरळा बाब नाही.

हुकुम गाजवणाऱ्यांच्या मनातली असुरक्षितता हा या हुकुमशहांचा मुख्य गुणधर्म. आपली ताकद, आपली इतरांना वाटणारी भीती कमी होईल का याचीच भीती घेऊन जगणारे आजी माजी हुकुमशहा एकत्र आले तर? जगातील हुकुमशहांनो, एक व्हा असा नारा दिला तर?

सध्याचे आघाडीचे हुकुमशहा उत्तर कोरियाचे किम जोंग उन यांची होणारी मनोवस्था आपण समजू शकतो. साधे साधे, अघोषित आणि benign भासणारे हुकुमशहा जर इनसिक्युरिटीचे शिकार होत असतील

तर घोषित आणि नामचीन हुकुमशहा किम जोंग उन यांची अवस्था काय असेल?

अशाच एका क्षणी किम जोंग उन आजी माजी हुकुमशहांना पाचारण करतात. त्यांच्याकडून तानाशाहीच्या अमरत्वासाठी मार्गदर्शन घेण्याकरता.. त्याचीच ही 'कहाणी'.

सदर नाटक दीर्घांक स्वरूपात रंगवाचाच्या दीर्घांक स्पर्धेकरिता लिहिले होते. स्पर्धेची प्राथमिक फेरी पार पाडल्यावर परीक्षक श्री.प्रदीप वैद्य आणि श्री.किरण यज्ञोपवीत यांच्या बहुमूल्य सूचनांनंतर पुनर्लेखन केले आहे. (सदर नाटकाची निवड मात्र अंतिम फेरीत झाली नाही). परीक्षक द्वय आणि रंगवाचाचे श्री वामन पंडित यांचे मार्गदर्शनाबद्दल मनापासून आभार.

राजकारणाच्या मुळाशी 'दुरितांचे तिमिर जाओ' अपेक्षित असते. ते सोडून थेट सर्वांना 'दुरित' बनवणारी 'तिमिरसंपन्न' व्यवस्था बनवू पाहाणाऱ्या, आपापल्या देशाला उन्नतीपथावर नेण्याची स्वप्ने दाखवत त्यासाठी 'रात्रंदिवस' झटणाऱ्या सर्व तानाशाहांचेही आभार. तेच नसतील तर कथावस्तूला आधार तो कोणता?

डॉ.नितीन मोरे

तानाशाही अमर रहे..

किम जोंग उन चे ऑफिस. एक मोठा हॉल. प्रशस्त असा. मोठे टेबल, त्या भोवती मांडलेल्या रिकाम्या खुर्च्या. पाठी उत्तर कोरियाचा झेंडा. आजूबाजूला पावलापावलावर बंदूकधारी शिपाई उभे आहेत. जमिनीवर तीन मृतदेह आहेत. त्यातील एक किम जोंग उनसारखा.

किम यो जोंग घाईघाईने आत शिरते.. समोर मृतदेह पाहून किंचाळते..

किम यो जोंग: ओह नो! इकडे ही मृतदेह! दाटला सारा जगी हा मृतदेहांचा पसारा?

एकाएकी लक्ष किम जोंग उनच्या मृतदेहाकडे जातं.. तिला धक्का बसतो.

किम यो जोंग: ओह नो! दादा तू गेलास? अरे, तुला महत्वाचं काही सांगायला आलेली मी. पण तूच नाहीस आता? या मृतदेहांच्या पसाऱ्यात तुझापण मृतदेह? तू सर्वांहून वेगळा होतास. पण सामान्य माणसासारखा मेलास? हाऊ कॅन यू?

तू असा 'दे ऑल्सो रॅन' मध्ये? नो, रॅन कसं म्हणणार? डेडबॉडी धावणार कशी? पण असं शोभतं का तुला सर्वसामान्यांसारखं मरणं? आता या उत्तर कोरियाचं काय होणार? तू अर्ध्यावरती डाव मोडून गेलास, आता ह्या हुकुमशाहीत हुकुम कोणाचा? असा अवकाळी मृत्यू? तो ही ज्याला अमर होण्याची आस लागलेली अशा तुला? आता न तू अमर होणार.. न अकबर, न अँथनी? (स्वत:शीच..) छे! प्रसंग काय आणि माझे विचार काय! आता पुढे काय? या माझ्या उत्तर कोरियाला आता प्रश्न पडेल नि त्याचं उत्तर शोधावं लागेल? माझ्या आजोबांचं, बाबांचं रक्त.. तेच जे तुझ्या देहातून इकडे वाहतेय तेच.. माझ्याही नसांत आहे.. मग मीच शोधेन ते उत्तर.. उत्तर कोरियासाठी उत्तर.. मलाच शोधावं लागेल.. शोधते.. शोधावंच लागेल.. कारण मी ही आहे किम.. किम यो जोंग.. दादा, जस्ट वेट! घाई नको उगाच. तू आता नाहीतरी मेलेलाच आहेस. तर थांबशीलच थोडावेळ.. हे बाकी दोन कोण? हू एव्हर! ऑर्डिनरीच दिसताहेत! पण मी आलेच. हॅव टू गेट धिस मेस क्लिअर्ड! (टीव्हीवर घोषणा केल्यासारखी किमला उद्देशून..) डोन्ट गो एनीव्हेअर.. आय विल्बी राईट बॅक..

किम यो जोंग बाहेर निघून जाते. शिपाई येऊन ते तीन मृतदेह ओढत घेऊन जातात. तीन जण जमिनीवरचं रक्त पुसतात. हे होता होता काही क्षण अंधार. परत उजेड होत असताना बंदुकीने गोळ्या झाडल्याचे दोन आवाज.. मरताना माणसांचं किंकाळणं. पाठोपाठ मध्यभागी जनरल किम जोंग उन लष्करी गणवेशात रूबाबात उभा आहे. हातात बंदूक. बाजूला दोन जण मरून पडलेले. तो बंदुकीच्या टोकावर फुंकर मारत उभा.

किम जोंग उन: गेले! दोन जणांना त्यांच्या निर्मात्याकडे धाडले. मी असं नेहमी नाही करत.. ऑफिसात तर नाहीच! शिपाईच आटोपतात सारं! ब्लडी द ब्लड मेक्स इट मेसी! पण काय करू? रागच अनावर झाला नि..

किम यो जोंग पाठून येते..
किम जोंग उन ला पाहून दचकते. एकाएकी काहीतरी समजल्यासारखं ..

किम यो जोंग: ओह! ग्रेट! म्हणजे दादा तू जिवंत आहेस.. वा! मला तर चिंता वाटलेली तू गेलास. मी विचार करत होते, तूच

गेलास, तुझ्या तेराव्यासाठी कोणाला बोलवावं.. कारण त्या सिक्रेट भटजीबुवांचा नंबर तुझ्याकडेच ..

किम जोंग उन: यो.. तुझ्या डोक्यावर परिणाम झालाय का? की लहान असताना घसरगुंडीवरनं एकदा पडलेलीस डोक्यावर.. त्याचा डिलेड इफेक्ट? मी इकडेच आहे. अगदी अलाईव्ह आणि (फुटबॉलसारखी किक मारत) किकिंग! जिंदा आणि जिंदादिल!

किम यो जोंग: जिंदादिल डिक्टेटर? पण ते राहू देत. त्या इकडे तीन डेडबॉड्या होत्या.. वन सेक.. (दोन मृतदेहांकडे पाहात..) ते वेगळे होते. हे वेगळेच.. त्यात तुझा तिसरा ..

किम जोंग उन: तो आता विसरा!

किम यो जोंग: मला काहीच समजत नाहीए..

किम जोंग उन: दॅट्स राइट! आय कॅन अंडरस्टँड दॅट यू कॅन नॉट अंडरस्टँड! अगं हे अगदी फ्रेश मृतदेह आहेत, बुलेट फ्रेश सिस! टू हॅव गॉन! नायदर पॅरागॉन नॉर बेगॉन. जस्ट गॉन! त्यांच्या त्यांच्या कर्माने गेली झुरळं!

किम यो जोंग: इऽऽ.. कुठेत दादा झुरळं? मला भीती वाटते झुरळांची..

किम जोंग उन: (प्रेतांकडे बोट दाखवत..) हीच सिस्टर. हीच झुरळं.

किम यो जोंग: ओह! मग ठीक आहे. मी झुरळांना भिते..

किम जोंग उन: सो, द कर्मा कॅचेस अप..

किम यो जोंग: नॉट ओन्ली कर्मा.. तुझ्या धर्माने गेले.

किम जोंग उन: अर्थात. जिथे धर्म तिथे मी! आणि माझा धर्म..
हुकुमशाही! धर्माचारण हाच माझ्या राज्याचा पाया, जो कधी न जाईल वाया! पाया आणि वाया? नो! नुसतं यमक जमलं म्हणजे होत नाही कविता! ब्लडी कविता! कवी नि लेखक मंडळींचे नसते लाड नकोत! नसती थेरं नुसती! बघतेयस यो.. दॅट वन ऑन द लेफ्ट .. लेखक होता म्हणे. कथाकादंबरी लिहायचा आणि तो उजवीकडचा म्हातारा .. हसत होता! ही वॉज कॉट रेड हँडेड. ही वॉज फाउंड लाफिंग.. इन माय नॉर्थ कोरिया! द लाफिंग बुद्धा! लाफेबल! कुणी म्हणे वेड लागल्याने हसत होता तो. व्हॉटेव्हर! हसण्यावारी न्यायची गोष्ट नाही ही! संपवलं दोघांना. कविता करतात! हसतात! देशद्रोही लेकाचे!

किम यो जोंग: पण दादा ते? इकडे होते त्या डेडबॉडीज..? तीन!
नव्हे. तू नाहीस. तू जिवंत. स्कोअर इज टू डेड वन अलाइव्ह! त्या बॉड्या? (दोघा मृतदेहांकडे पाहात) आणि जिकडे पाहावे तिकडे फक्त मृतदेह?

किम जोंग उन: हा! हा! हा! हा! तीच तर नॉर्थ कोरियाची खरी गंमत आहे! आणि ती डेडबॉडीजची एक वेगळीच स्टोरी आहे. नंतर सांगतो..

किम यो जोंग:(लहान मुली सारखी) नक्की ना दादा? मला आवडतात गोष्टी! गोड गोड गोष्टी! डेडबॉडीजच्या गोष्टी! पण दया येते मला ब्रो तुझी. इतकी मेहनत करतोस. दिवसरात्र एक करतोस. कोणाकोणाला नाही मारलेस तू? तरीही ही अशी कवी लेखक नि हसणाऱ्यांची पिलावळ दिसतेच..

किम जोंग उन: पिलावळ कसली, भुतावळ यो. जगाच्या दमना माझीच विभूती. मला ठाऊक आहे माझे जिवितकार्य. त्यासाठी मी दिवसरात्र, आकाशपाताळ आणि जे जे काही शक्य असेल ते ते.. एक करीन.

किम यो जोंग: तू ते एक करशीलच! पण ब्रो.. आधी ती गोष्ट.. सांग ना दादा.. प्लिज.. नाहीतर या भाऊबीजेला ओवाळणार नाही तुला मी ..

किम जोंग उन: बापरे! असं म्हणतेस? हट्टी आहेस सिस!

क्षणभर अंधार. स्थळ तेच.

किम जोंग उन उभा आहे. दरवाजातून दोन शास्त्रज्ञ आणि एक किम जोंग उनसारखाच व्यक्ती येऊन उभे राहतात. दोघं शास्त्रज्ञ सॅल्यूट ठोकतात.

शास्त्रज्ञ एक: कॉम्रेड, तुमच्या हुकुमानुसार. वुई हॅव अचिव्हड द टारगेट. ॲट युवर सर्व्हिस साहेब!

शास्त्रज्ञ दोन: सर, पंचवीस वर्षांपूर्वी सुरू केलेला प्रयोग आज संपला. ही इज अ फुल्ली इव्हॉल्व्हड ट्वेंटी फाईव्ह इयर्स यंग व्हर्जन. सर, धिस क्लिन क्लोन.. दॅट विल एन्शुअर यू आर नॉट अलोन!

शास्त्रज्ञ एक: सर, बघा. हुबेहूब. जीव, भौतिक, रसायन.. सर्व शास्त्रांतून उत्पन्न आणि निष्पन्न .. प्रेझेंटिंग द वन अँड द ओन्ली वन...

शास्त्रज्ञ दोन: नो नो.. वेट फॉर अ सेकंद.. द सेकंड! कॉम्रेड किम जोंग उन.. नंबर टू.. द वन अँड द ओन्ली सेकंड..

शास्त्रज्ञ एक: यस्सर, आय सेकंड दॅट..

किम जोंग उन त्या क्लोनकडे पुढून मागून पाहातो..

किम जोंग उन: वॉव! हॅड आय बीन द मोगँबो, म्हटलं असतं मोगँबो खुश हुवा! बट नो! बीफोर दॅट, प्रूफ ऑफ पुडिंग इज इन इटिंग!

शास्त्रज्ञ दोन: ओके सर, वॉव. थँक्स. वन चाॅकलेट पुडिंग फॉर मी.. (पहिल्याला विचारत..) अँड व्हॉट अबाऊट यू.. स्ट्राॅबेरी? सर, डू यू हॅव इट? बट व्हिगन हां सर..

किम जोंग उन संतापाने पाहातो.. कष्टाने दुर्लक्ष करत.. मोठ्याने..

किम जोंग उन: सो, द प्रूफ ऑफ किम जोंग उन इज इन किलिंग..

क्लोनच्या हाती बंदूक देत..

किम जोंग उन: घे! जस्ट किल एनी वन ऑफ धिज टू..

क्लोन: कोणाला मारणार? मी?

किम जोंग उन: तुला आवडेल त्याला. घाल गोळ्या.

क्लोन: बट व्हाय? जो मला आवडतो त्याला मी गोळ्या का घालू? माणसाला मी मारू का? नो.. एका माणसाला मी का मारू? का मी माणसाला मारू?

किम जोंग उन: च्या मारू! म्हणे कां मारू? हा प्रश्न शोभतो तुला? माणसाला मारायला कारण लागतं का? घाल तिच्या मायला एकाला गोळ्या.. (घड्याळाकडे पाहात..) युवर टाइम स्टार्ट्स नाऊ..

क्लोन थरथर कापायला लागतो..

क्लोन: मारायलाच हवा? पण का? व्हाय?

किम जोंग उन चिडतो. एकाएकी पुढे येत..

किम जोंग उन: हा काय प्रश्न झाला? नो! तू मी नव्हेच! डझ एनीबडी डेअर टू आस्क धिस क्वेश्चन? तो ही द ग्रेट डिक्टेटर ऑफ नॉर्थ कोरियाला? नाही.. यू थ्री.. यू डोन्ट डिझर्व्ह टू बी ऑन धिस अर्थ.. पुडिंग खाताय म्हणे.. खायला काळ अन भुईला भार.

(तिघांना गोळ्या झाडता झाडता..)घे.. चाॅकलेट पुडिंग फॉर यू.. तुला स्ट्राॅबेरी.. तुला.. नथिंग..

एकेक मरून पडतात. किम जोंग उन बाहेर जाता जाता..

किम जोंग उन: ब्लडी ब्लडबाथ. उगाच ऑफिसात साल्या डेडबॉड्या. (हाक मारत) शिपाई, जस्ट क्लिन दी मेस. अजून दोनचार शिपायांना बोलाव. तीन आहेत बॉड्या. मोजून घे.. पुडिंग खाताहेत साले.. व्हिगन..

परत क्षणभर अंधार. आधीचेच दृश्य.

किम जोंग उन: पाहिलंस, ही होती ती गोष्ट.

किम यो जोंग: दादा, यू आर सच अ गुड स्टोरी टेलर! डोळ्यांपुढे अगदी चित्र उभं राहिलं! पण म्हणजे? दे हॅड क्रिएटेड युवर क्लोन? आय कान्ट बिलिव्ह धिस!

किम जोंग उन: अगं, आय वॉज सो थ्रिल्ड! म्हटलं नो वरीज इव्हन इफ आयॅम नॉट देअर! पण नो! क्लोन तर बनला! पण माशी शिंकली! शिंकलीच नाही नुसती तर तिला खोकला ही झाला नि पडसं देखील! जो साधा माणूस मारताना थरथर कापतो तो कसला किम जोंग उन? 'तो' मी नव्हेच! (हिंदी सिनेमात म्हातारी आई भावी सुनेबद्दल बोलते त्या सुरात) म्हटलं क्लोन येईल.. कामं करेल. माय हुकुम्स विल्बी मल्टिप्लाइड बाय टू.. पण नाही! असला बुळ्या क्लोन. क्लोन कसला.. क्लाऊन! आय गॉट ऑल थ्री ऑफ देम आऊट! तीन बुलेट्स अँड तीन विकेट्स!

किम यो जोंग: दादा, ते गेले ना.. गेले ना आता? मग आता ह्या दोघांचं काय ते.. जिकडे पाहावं तिकडे डेडबॉड्याच डेडबॉड्या..

किम जोंग उन: अगं, त्या देखील जातील.. ब्लडी धिस ब्लड इज अ बिग मेस! रक्तपात न होता का मरत नाहीत हे लोक? शिपाई..

शिपाई तत्परतेने आत येतात. डेडबॉड्या घेऊन जात असताना..

किम यो जोंग: पण मला तुला काही सांगायचंय दादा..

किम जोंग उन: ऑल इज वेल ना सिस?

किम यो जोंग: अर्थात ब्रदर! तू असताना एव्हरीथिंग हॅज टू बी वेल! आणि नसेल तरी इट विल्बी कॉल्ड सो!

किम जोंग उन: अर्थात! अर्थातच! न्यूजवाल्यांना तसा आदेशच दिलाय मी!

किम यो जोंग: आय नीड टू टेल यू समथिंग रियली इम्पा ॅर्टंट दादा.. मला हे सांगावंच लागेल..

किम जोंग उन: डोन्ट टेल मी..

किम यो जोंग: तुला ऐकावंच लागेल दादा. ब्रो, यू हॅव टू लिसन.. प्रश्न भविष्याचा आहे. भवितव्याचा आहे..

किम जोंग उन: तू काही ही सांग पण हे नको. नो! नेव्हर! मी, तुझा हा खराखुरा भाऊ.. नॉट दॅट क्लाऊन क्लोन..

किम यो जोंग: ऐक तर दादा..

किम जोंग उन: नो! नेव्हर! मी जिवंत असताना तू तुझं लग्न ठरवूच कशी शकतेस? किम घराण्याची इज्जत आणि प्रतिष्ठा.. ती धुळीला मिळवणार? आज.. आज अगर पिताजी जिंदा होते तो वे क्यां सोचते यो?

किम यो जोंग: अय्य..यो! दादा.. हे तू काय बोलतोयस दादा?

किम जोंग उन: आय विल गेट हिम किल्ड.. सांग कोणाची हिंमत झाली.. हु टू किल? मी सोल्जरला बोलावतो.. जस्ट वन मोअर डेड.. वन मोअर डेड बॉडी!

किम यो जोंग: शांत सत्ताधारी किम.. शांत! अरे, या राजघराण्यातली मी, तुझीच बहीण. आपल्या बाबांचे नि आजोबांचेच रक्त माझ्या नसांत आहे. तसे असताना असे विचार माझ्या मनात येतील असा विचार तुझ्या मनात आला तरी कसा? अरे दादा, त्याहून महत्वाची गोष्ट आहे..

किम जोंग उन: काय सांगतेस?

किम यो जोंग: आहे. ती यु ट्यूबवर..

किम जोंग उन: काय? यु ट्यूब वर? हाऊ डू यू नो अबाऊट द यु ट्यूब?

किम यो जोंग: अरे, आपल्या गुप्तचरांनी संदेश पाठवला आहे.. मला वाटतं तूच तो व्हिडिओ पाहा आणि ठरव..

किम जोंग उन: अर्थात. आताच पाहतो.. माझं काम म्हणजे आज, आत्ता, ताबडतोब. शिपाई..

सगळे बंदूकधारी अटेन्शन मध्ये उभे राहतात.

किम जोंग उन:अबाउट्ट टर्न.. पाठ करून उभे रहा.

सगळे शिपाई पाठ करून उभे राहतात.

किम जोंग उन: यो .. लाव गं तो व्हिडिओ..

किम जोंग उन आणि यो जोंग लॅपटॉपवर व्हिडिओ पाहताहेत.. थोड्यावेळाने..

किम जोंग उन: (संतापाने) ओह गॉड! ओह! आज आता हेच व्हायचं बाकी होतं. आधी ते ब्लडी युझलेस सायंटिस्ट्स, क्लाउनिश क्लोन, मग ती झुरळं आणि आता हे! धिस इज नॉट डन! लोकशाही! लोकशाही! लोकशाही! व्हाय? नो.. नाय.. नेव्हर! नेव्हर एव्हर! मी काय करणार? तहहयात राज्य चालवणार! तहहयात! पण हाऊ? द वर्ल्ड इज प्रेशरायजिंग.. लेट देम! म्हणे साऊथ आणि नॉर्थ कोरिया

मध्ये फरक काय? दे हॅव द्याट ब्लडी लोकशाही? व्हॉट डू दे मीन? आयॅम द ग्रेटेस्ट!

किम यो जोंग: आय अंडरस्टँड ब्रो. बघ, हे असलं सगळं चालू असतं नेटवर..

किम जोंग उन: यो, सी आयॅम ऑल्वेज राईट. नो इंटरनेट ॲक्सेस टू द ब्लडी ऑर्डिनरी पीपल.. नाहीतर त्यांच्या मनावर काय परिणाम झाला असता? म्हणून या शिपायांना पण पाठ करून उभं केलं.

किम यो जोंग बाजूला उभी आहे. पण किम जोंग उन स्वगत म्हटल्यासारखा ..

किम जोंग उन: मी सर्वसत्ताधीश. द ग्रेट डिक्टेटर! वन अँड द ओन्ली कॉम्रेड किम जोंग उन, उत्तर कोरियाच्या उद्धारासाठी काय नाही केलं मी? मी आहे म्हणून हा देश आहे. मी आहे म्हणून प्रगती आहे. मी आहे म्हणून विकास आहे. मी म्हणजेच देश. देश म्हणजेच मी. या देशाखातर मी काय काय नाही केले? ते पाहिलंत ना? त्या दोघांना झुरळासारखं चिरडलं मी. हा देश सर्वात शक्तिवान व्हावा म्हणून मी सर्वशक्तिमान होतो आहे. जो कोणी विरोध करेल त्याला यमसदनी धाडतो आहे. पण.. मी आहे तोवरच सारे ठीक. आणि जर मीच नसलो तर..

किम यो जोंग: दादा, काय बोलतोयस हे? (नाटकीपणे) अरे, देशोदेशीच्या एकेका सत्ताधाऱ्याचा तू आदर्श. अरे, तुझ्याकडे पाहून एकेकाने चळाचळा कापावे. तुझ्या कीर्तीचा डंका देशविदेशातच नाही तर परग्रहावरही वाजावा. अरे, उत्तर कोरियात एकेका विरोधकाला निरूत्तर करण्यासाठी कधीच बुलेट्सच्या खर्चाची पर्वा केली नाहीस तू .. प्रसंगी स्वत:ची खिसामोड केलीस त्यासाठी आणि तू.. तूच नसल्याची गोष्ट करावीस तू?

किम जोंग उन: नो सिस, देशासाठी मी हयात देईन. तहहयात मी देशाचा हुकुमशहा राहिन. आजवर जगात कितीएक होऊन गेले आदर्श हुकुमशहा. पण शेवटी काय झालं? त्यांचाच अंत? व्हाय? तहहयात हुकुमशाहीसाठी हयात वाढायला नको? अमर्याद?

किम यो जोंग: आज हे अचानक काय ब्रो?

किम जोंग उन: हुं. आज एकेक गोष्ट अशी घडते आहे. माझ्या मनातील ही एक भीती नेहमी मग डोकं वर काढते. व्हॉट विल हॅपन टू माय बिलव्हेड कंट्री आफ्टर मी? दे से वुई डिक्टेटर्स आर इनसिक्युअर! असणारच! अरे देशाच्या कल्याणासाठी आयुष्य देणाऱ्या आमच्या सारख्यांनाच कळेल ते.

किम यो जोंग: संकटं अशी एकत्रच येतात का एका मागोमाग एक? आणि आज पाठोपाठ हे सगळं. तुला असं इनसिक्युअर वाटणं साहजिक आहे ब्रो. पण काही न काही उपाय निघेल. निघेलच.

किम जोंग उन: काढावाच लागेल उपाय. परत क्लोन बनवण्याचा प्रयत्न.. पण तो वेळखाऊ आहे. नि परत त्या मूर्ख शास्त्रज्ञांनी गोंधळ घातला तर.. डोन्ट नो! त्यामुळे अजून काहीतरी. लेट्स थिंक. सो नाऊ व्हॉट? काय करूया?

किम यो जोंग:लेट्स थिंक.. मी सांगते दादा..

दोघे विचार करत डोकं खाजवत फेऱ्या मारतात. किम जोंग मध्येच खिशातून कंगवा काढतो. कंगव्याने डोकं खाजवतो. तोच कंगवा यो ला देतो आणि याच्याने डोकं खाजव अशी खूण करतो. ती त्याच कंगव्याने डोकं खाजवत फिरते. थोड्याच वेळात..

किम यो जोंग: धिस कंगवा इज चमत्कारी दादा! मला सुचलंय!
किम जोंग उन: काय यो?

किम यो जोंग: लेट्स डू इट धिस वे.. दादा, व्हाय नॉट हॅव अवर ॲन्ससेस्टर्स कम ओव्हर.. पूर्वजांना विचारूया..

किम जोंग उन: म्हणजे काय सिस?

किम यो जोंग: सिंपल ब्रो. लवकरच सर्वपित्री अमावस्या आहे त्यावेळी येतीलच सर्व पितर..

किम जोंग उन: ग्रेट आयडिया यो.

किम यो जोंग: बाबा येतील, नवीन जन्मात गेले नसतील तर कदाचित आजोबाही येतील. त्यांच्या आशीर्वादाने नि मार्गदर्शनातून आपला उत्तर कोरिया अजून सुभयाम सुफलाम होईल..

किम जोंग उन: राईट सिस! (थोडा विचार करत) पण मी म्हणतो व्हाय ओन्ली पितर्स? नो? लेट्स कॉल देम ऑल! आय मीन शक्य तितक्या सर्व डिक्टेटर्सना बोलवू. हिटलर, स्टालिन, मुसोलिनी एट आल.. अनुभवी जणांकडून लेट मी गेट इनपुट्स अँड द गायडन्स! दे आर माय गायडिंग लाइट्स. दे आर ॲक्च्युअली लाइक माय ॲन्सेस्टर्स.. एक एक जण म्हणजे जणू हुकुमशाहीचे विद्यापीठ .. हिटलर.. माय आयडॉल. तानाशाह कैसा हो? ॲडॉल्फभाई जैसा हो.. कॉल देम ऑन सर्वपित्री अमावस्या मिटींग.. होऊन जाऊ दे! लेट मी लिसन टू धिज धुरंधरांच्या कहाण्या अँड गेट रिचार्जड..

रंगमंचावर अंधार.

परत उजेड होतो तेव्हा..

स्थळ तेच. पाठीमागे 'जागतिक हुकुमशहांचे पहिले शाही संमेलन' 'सर्व माजी हुकुमशहांचे आजी हुकुमशाहीत स्वागत' असे मोठे फलक. जगातले वेगवेगळे डिक्टेटर्स समोर विराजमान आहेत. त्यांच्यासमोर नावाच्या छोट्या पाट्या.

संमेलन सुरू होणार आहे. बाहेर किम जोंग उन ने गर्दी जमवलेली आहे. तिचा आवाज म्हणजे गोंगाट कानावर येत आहे. मध्यभागी बसलेला किम जोंग उन. त्याच्या समोर 'रिस्पेक्टेड कॉम्रेड किम जोंग उन, सुप्रीमो उ.कोरिया. किलिंग स्कोअर: स्टिल काउंटिंग, स्वागताध्यक्ष' अशी पाटी आहे

त्याच्या बाजूला किम यो जोंग उभी आहे.

किम यो जोंग: (एका कागदावर लिहिलेले वाचून दाखवते.) सुस्वागतम.. सुस्वागतम. आगतम स्वागतम.. या पृथ्वीवरील ओपन जेल अशी ख्याती असलेल्या पोलिस स्टेटमध्ये सर्वांचे स्वागत आहे. आमचे पिताजी आणि आजोबा यांची परंपरा जपणे, वाढवणे आणि उत्तर कोरियापुढे सर्वांना निरूत्तर करणे या एकमेव ध्येयाने प्रेरित होऊन जनरल किम जोंग

उनने सत्तासूत्रे हाती घेतली. त्या गोष्टीस आता काही वर्षे झाली. या वर्षांत आम्ही काय काय नाही केले? बलवान माणसाने कमजोर माणसावर हुकुम चालविणे या सारखी सुंदर गोष्ट जगात नसेल. छळछावण्यांचा आदर्श घालून देणारे आपले सर्वांचे आदर्श ॲडॉल्फजी हिटलरजी इकडे आहेत. त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन संपूर्ण देशासच छळछावणी का बनवता येऊ नये ही कल्पना काही वर्षांपूर्वी सुचली. आणि 'जे मनात ते लगेच सत्यात' उतरवण्यासाठी उत्तर कोरियन सरकारने म्हणजेच जनरल किम जोंग उनने त्वरेने पावले उचलली. त्या अंतर्गत विविध योजना आखल्या गेल्या. उदाहरण द्यायचे तर 'किम्स एक देश एक केशरचना योजना.' अर्थात उत्तर कोरियन हेअर स्टाईल. सर्व स्त्री आणि पुरूषांची केशरचना एकासारखी एक हवी. कुणी म्हणेल यात छळ कुठला? पण जनतेच्या मनात काय येईल ते सांगता येते? बोलण्यावर गदा आणली, लिहिण्यावर बंधने आणली तरी शांत राहणारे सारे या केशरचनेच्या बंधनावरून रस्त्यावर आलेले. जनतेला काय महत्वाचे वाटेल सांगता येत नाही! तो विरोध आम्ही निकराने मोडून काढला. तरीही आजच.. अगदी आज सकाळी.. केस वाढवलेल्या दोन पुरूषांना आमच्या शूर सैनिकांनी गोळ्या घालून ठार केले. कॉम्रेड किम जोंग उन त्यामुळे अतिशय अस्वस्थ झाला. साध्या माणसांना मारायला

बहुमूल्य अशा बुलेट्सची नासाडी? ती ही हुकूम तोडल्यामुळे? आम्ही दहशतीत कोठे कमी पडतो? लोकांच्या मनात ही ऊर्मी येते कुठून? चारी दिशांनी बंदिस्त देशात हे विचार कुठून शिरकाव करतात? अशा अस्वस्थतेच जगभर लोकशाही नामक भयंकर व्यवस्थेबद्दल चर्चा चालू असल्याच्या बातम्या आहेत. राज्य चालवणे आणि लोकांचा संबंधच काय अशा पवित्र विचारसरणीचे पाईक अशा आपणा सर्वांना त्यामुळे आमंत्रित करावे असा विचार आला. तेव्हा सर्व पितरांचा हा पृथ्वी पर्यटनदिन जवळच होता. या सर्वपित्री अमावस्येचे औचित्य राखत आज या ठिकाणी आपण सारे जमले आहोत.

अजून एक औचित्य आहे आजच्या या शुभ दिनाचे. आज उत्तर कोरिया हास्यबंदीचा प्रथम वर्धापन दिन आहे. बरोबर एक वर्षापूर्वी आम्ही उत्तर कोरियात हास्य बंदी आणली. कोणीही कुठेही उघड अथवा चोरून हसण्यावर बंदी आणली गेली. जगात दु:खाचा सागर असताना, त्या सागरात थेंबाथेंबाने भर घालण्याचा आमचा अथक प्रयत्न सुरू असताना, इकडे कोणीही हसणे हे माणुसकीस धरून नाही. या उदात्त विचाराने प्रेरित होऊन ही हास्यबंदी लागू झाली त्यास एक वर्ष आज झाले. आपणा सर्व महारथी हुकुमशहांचे संमेलन त्यानिमित्ताने भरवले जावे हा उत्तर कोरियन दमनशाहीस एक प्रकारचा आशीर्वादच समजते मी. असो.

एवढं बोलून पुढच्या कामकाजासाठी.. कॉम्रेड किम जोंग उन विल टेक ओव्हर.

किम जोंग उन: वेलकम टू माय पितर्स, माय फ्रेंड्स, फिलॉसॉफर्स अँड गाइड्स. या जागतिक हुकुमशहांच्या शाही संमेलनात सगळ्यांचे बंदुकीच्या सलामीने स्वागत आहे. (बाहेरून बंदुकीने गोळ्या झाडल्याचे आवाज येतात..) कुणी म्हणेल या संमेलनात मीच एक तो सध्या सत्ताधारी जिवंत डिक्टेटर आहे. आणि येथे उपस्थित मान्यवर हिटलर, मुसोलिनी आदि कधीच भूतलावरून अस्त पावले आहेत. पण तिकडे दूर इंडिया नामक देशात रामदास नामक संत होऊन गेले. त्यांनी म्हटल्याप्रमाणे ते मेले परि कीर्तीरूपी उरले आहेत. पिढ्या न पिढ्या त्यांच्या क्रौर्यकहाण्या जनमानसात सांगितल्या जात आहेत आणि जातील. त्या लोककथांपासून बोध घेऊन मी उत्तर कोरियाला पोलिस स्टेट म्हणून घडवत आहे आणि घडवत राहिन. वारशात मिळालेल्या या देशाला एक ओपन जेल बनवण्यासाठी मी अपार मेहनत घेण्याची शपथ घेतली त्याला कितीतरी वर्षे झाली. माझे पिताश्री किम जोन इल आज इथे आहेत. त्यांचा आणि माझ्या आजोबांचा वारसा मी पुढे चालवीत आहे. माझ्या क्रूरकर्मांचे गायन पुढे किती शतके चालेल यावर माझ्या हुकुमशहा म्हणून मिळवलेल्या यशाचे मूल्यमापन होईल.

आज जगभर लोकशाही नामक राक्षसी पद्धतीचा बोलबाला आहे. जगाच्या कारभाऱ्यांच्या पंगतीत आम्हा हुकुमशहांचे पान आडवे मांडले जात असेल तर ह्या संमेलनात त्याबद्दल विचार होणे आवश्यक आहे. ह्या संमेलनास उपस्थित राहण्यासाठी वेळ मिळावा म्हणून ह्या दोन तीन तासांत मारली जाणारी माणसे मी ॲडवान्समध्ये यमसदनी कालच धाडली आहेत. दररोजचा नरशिरच्छेदाचा कोटा पुरे करण्याचे कर्तव्य नजरेआड होऊ न देण्याची कर्तव्यकठोरता मला पिताजींकडून वारशात मिळाली आहेच.

किम यो जोंग हिने हे संमेलन ही काळाची गरज कशी आहे हे सांगितले आहेच. पृथ्वीतलावर काही ठिकाणी काही संत मंडळी माणूस आणि माणुसकी याबद्दल काहीबाही सांगून गेली आहेत. त्या संतांबद्दल मी काय सांगणार? एवढंच सांगेन, त्यांनी स्वत:चे काम केले. मी या देशाचा सर्वेसर्वा. मी माझे काम करेन. माझे लक्ष ध्येयाकडून विचलित होऊ न देता उत्तर कोरिया नामक देशास मी दहशतीचे नंदनवन बनवेन. आपणा सर्वांनी त्यासाठी आपल्या कृत्यांतून आदर्श घालून दिलेला आहेच. ॲडॉल्फजींपासून ते सद्दाम हुसेनजीं पर्यंत सारे आदर्श येथे उपस्थित आहेत. कुणीतरी म्हटले आहे, जगात गाढवंच जास्त. कुंभार कमी. तेव्हा आपण कुंभार व्हावे आणि या जनता नामक गर्दभांकडून आपल्याला हवे ते करून घ्यावे!

कित्येक जणांस ते गाढव आहेत अथवा त्यांना तसे बनवले गेले आहे हेच समजत नाही! काही स्वखुशीने तसे बनले आहेत. आणि मला वाटतं हेच आपले यश आहे! अर्थात गाढवांची संख्या वाढवत राहणं, गाढवीकरणाच्या प्रक्रियेस वेग देणं हे कोणत्याही हुकुमशहासाठी महत्वाचे आहे. त्यासाठी विविध क्लृप्त्या वापरतानाच क्रूरकर्म्यांची दहशत वाढती राहावी लागते. सत्ताधीशाची दहशत ही एक चिरंतन स्मरणात राहणारी बाब असावी यासाठी आपणा सर्वांनी आयुष्य वेचले. त्याखातर अगदी प्राणार्पण केले. अशा आदर्शांपुढे नतमस्तक होत या संमेलनाची सुरूवात आम्ही करत आहोत. माझ्यासाठी घरातूनच हुकुमशाहीचे बाळकडू मिळाले. बालपणी आपण सर्व क्रूरकर्म्यांच्या कथा ऐकत त्यातून मी स्फूर्ती घेतली आहे. आमच्या पिढीचे तुम्ही सर्व आदर्श आहात. सर्वपित्री अमावस्येच्या निमित्ताने आपण सर्व इकडे एकत्र येऊ शकलो असलो तरी परंतु आपणांपैकी सर्व समकालीन नाहीत. त्यामुळे एकमेकांशी परिचित नसाल. तेव्हा किम यो जोंग सर्वांचा अल्प परिचय करून देईल.

किम यो जोंग: *(एखाद्या कार्यक्रमात सूत्रसंचालिका उगाच काहीशी नाटकी आणि लाडिक सुरात बोलते तशा सुरात, हाती कागद घेऊन वाचते..)* थँक्यू कॉम्रेड. हुकुमशाही आणि हुकुमशहा हे शब्द उच्चारताच जगातील कुणाच्याही ओठावर जे एक नाव

येते ते ॲडॉल्फजी हिटलरजी आज इथे आहेत. (हिटलर हात वर करतो) त्यांच्या आधीही हुकुमशहा होऊन गेले. जूलियस सीझर, कमाल पाशा वगैरे. पण त्यांना कोणी हुकुमशहा म्हणून आज ओळखतात? ॲडॉल्फजी नंतरही हुकुमशहा होतील. हुकुमशाहीची ही मानवी अंत:प्रेरणा पुढेही राहिल. कुणी तरी म्हटले आहे, 'झाले बहु, होतील बहु, परि या सम हा..' तेव्हा शब्दश: 'जब तक सूरज चांद रहेगा ॲडॉल्फजीका नाम रहेगा' अशा कर्तृत्वाचे हिटलरजी आपल्याला आज भेटत आहेत. वंश विच्छेद व वंश विनाश यांच्या विशिष्ट प्रेरणेतून आलेली बर्फाच्या लादीपासून आगीच्या फुफाट्यापर्यंतची त्यांच्या छळछावण्यांची वर्णनं ऐकताना कोणत्याही हुकुमशहाची छाती गर्वाने फुलून येईल..

हिटलर: (उठून नमस्कार करत..) बंडु आणि भगिनींनो.. धन्यवाद!

इडी अमीन: नो भगिनी.. वोन्ली बंडु..

गडाफी: इडी भाय.. नो भगिनी. नो फन. साला आपल्या जमान्यात काय वट होती.. एव्हरीथिंग हॅज रॉटन साला!

हिटलर: अरे शांत व्हा. आय उंडरस्टँड युवर सेंटी अँड इव्हन मिलीमेंट्स. लेट यो कंटिन्यू..

किम यो जोंग: हिटलरजींनी आपल्या कार्यकाळात सात कोटींजनांना देवाघरी पाठवून आदर्श प्रस्थापित केला. त्यांचा रेकॉर्ड आजही अबाधित रहावा हेच त्यांचे मोठेपण..

हिटलर: खरंय! आम्ही होतो तेव्हा आमची काय दहशत होती. वटवट होती.. नाही, वट होती. आम्हाला बघून सामान्य जनता कळाकळा चापायची.. आय मीन, चळाचळा कापायची. ब्लड ब्लड ब्लडी एव्हरीव्हेअर.. रक्तगंगा.. गँजेस ऑफ रक्त..पुर

किम यो जोंग: त्या काळातले चंद्रा बेदी प्रसन्ना म्हणवणारे त्रिकूट म्हणजे ॲडॉल्फजी, जोसेफ स्टालिनजी *(उठून हात वर करतो)*, बेनीटो मुसोलिनीजी *(उठून सॅल्यूट करतो)* ते तिघे क्रिकेटमध्ये बळी घ्यायचे आणि हे खरेखुरे बळी. या तिघांनी पृथ्वीवरील वाढती मनुष्यसंख्या मर्यादित ठेवण्यासाठी अथक प्रयत्न केले.

मुसोलिनी: यस्स, ते तिघं बळी घ्यायचे नि आपणही बळीच घ्यायचो. हाहाहा! बळी तो कान पिळी? नो! आम्हीच बळीचे कान पिळायचो! कोण बंदुकीने गोळ्या झाडतोय तर कोण बंदुकीच्या दस्त्याने कोणाला झोडतोय.. कुणाची पिरगळली जाते मुंडी तर कुणाची झाडाला बांधून लटकावली जाते

शेंडी.. पण आपल्यासारखी जिती जागती माणसं मारायची हिंमत नाही च्यामारी कोणात..

स्टालिन: या! मी जिवंत असताना मला तर मेलेली माणसं दिसायची स्वप्नात!

किम यो जोंग: या यशस्वी त्रिकुटाबरोबरच आफ्रिकन हुकुमशाहीची उज्जवल परंपरा चालवणारे युगांडाचे श्री. इडी अमीनजी ..

इडी अमीन:(हात वर करत..) सलाम यू गांडा लोक..

किम यो जोंग: आणि लिबियाचे श्री. मुअन्नार गडाफीजी *(हात वर करतो)* आज येथे आहेत. क्रूरतेच्या जगात नवनवीन संकल्पना राबवत आफ्रिकन दमनशाहीला जागतिक स्तरावर नाव मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. बंदुकीच्या गोळ्यांसारखी महागडी आयुधं न वापरता हत्तींच्या पायाखाली तुडवणे, मगरींचा कल्पक उपयोग करत त्यांचे पोट भरून भूतदयेचा नवा आदर्श घालून देणे, असे विविध प्रयोग आफ्रिकेत झाले.

इडी अमीन: यस्स. मी एकेकाला मगरीच्या तोंडी दिले. एकटा हत्ती तरी बिचारा किती जणांना मारणार? पुअर हत्तीज वेअर सो ओव्हरवर्कड. सो आय वॉज इनोव्हेटिव्ह.. एम्प्लाॅइंग अ क्रोक बट नेव्हर शेडिंग एनी क्रोकोडाइल टियर्स!

किम यो जोंग: आफ्रिकन हुकुमशाहीत बंदुकीच्या गोळीशिवाय जीव जातील अशी पॅसिव्ह डेथ सिस्टिमची व्यवस्था करणारे इथिपोयिन मेंगित्सू मरियमजी आज इकडे नाहीत..

गडाफी: यस्स. साला ऐनवेळी त्याला तिकडे आफ्रिकेत जायला लागलं पितर म्हणून. यू नो, इथियोपियाला हंगर कॅपिटल ऑफ द वर्ल्ड म्हणून रिकग्निशन मिळालं तेव्हा जंगी पार्टी दिलेली त्याने सेव्हन स्टार हॉटेलमध्ये. व्हॉट फूड साला! तिकडच्यासारखी लाल मुंगळ्यांची हिरवी चटणी परत कुठे खाल्ली नाही! आठवतंय नि तोंडाला पाणी सुटतं अजून!

इडी अमीन: अँड डोन्ट फर्गेट हिसेनभॉय हाब्रे. ही युझ्ड टू से, मला कसलीच चाड नाही! चाडमध्ये असले अत्याचार करताना कसलीच चाड बाळगली नाही त्याने! अनफॉर्च्युनेटली हिसेनभाय आणि तो सुदानचा ओमर अल बशीर, दोघंपण तिकडेच गेलेत पितर म्हणून. बट व्हॉट ॲट्रॉसिटीज! ॲट्रॉशियस! वुई आफ्रिकन्स रॉक!

किम यो जोंग: आफ्रिकन हुकुमशाहीच्या बरोबरीने अर्ध्या कंबोडियाचा सफाया करणारे श्री.पोल पॉटजी देखील आज इकडे उपस्थित आहेत. (पोल पॉट हात वर करतो..) कंबोडियन कवट्या डिस्प्ले करत ॲट्रॉसिटी नावाचं शहरच वसवल्याची आठवण आजही हुकुमशाही जगात

अभिमानाने आपल्या सर्वांची मान ताठ करते.
त्यांच्याप्रमाणेच जपानचे हायडेकी ताजोजी आपल्या डीप फ्रीजमध्ये जपानी मुंडकी जतन करून ठेवायचे. काही कारणाने ते आज इकडे नाहीत. पण त्यांचे आशीर्वाद आपल्या सोबत आहेत. देन वुई हॅव अवर स्पेशल डिक्टेटर फ्रॉम साउथ अमेरिका. द वन अँड द ओन्ली पिनोचेट..

पिनोचेट डुलकी देत बसला आहे. बाजूचे दोघे त्याला हलवून उठवतात.. पिनोचेट दचकून जागा होत

फ्रँको: पिनोशेट.. पिनोशियो.. उठ की तिच्यायला..

पिनोचेट: काय? चिलीची धुरी द्यायची वेळ झाली? (एकाएकी जागा होत) सॉरी..जरा डुलकी लागली. पण काय दिवस होते! च्या मारी! मी तर शेजारचा पेरूपण चिली लावून खाल्ला असता! आपली थियरी पक्की, लाल चिलीची धुरी द्यून लंबे करायचं न माणूस कसा सरळ होतो पाहायचं.. मग लोकं म्हणायचे, चिली मध्ये चाललीय चिल्लंचिल्ली! व्हॉट दहशत ब्लडी! उगाच बंदुकीची गोळी वाया घालवायची नाय!

किम यो जोंग: दॅट्स रियली अ गायडिंग प्रिन्सिपल. अवर कॉम्रेड ऑल्सो फिल्स, नो अननेसेसरी वेस्टेज ऑफ प्रेशियस बुलेट्स.

किम जोंग इल: मग! माझी शिकवणच होती तशी!

किम जोंग उन: यस्स डॅड, खर्चात काटकसर आणि कमीतकमी बळात जास्तीत जास्त दहशत! व्हॉट वुई लर्न्ट फ्रॉम अवर डॅड इज बिइंग फॉलोड टिल टुडे!

किम जोंग इल: दॅट्स द लीगसी व्हॉट युवर ग्रँड पा लेफ्ट बिहाइंड! आयॅम प्राऊड ऑफ यू..

किम यो जोंग: वुई हॅव अमंग्स्ट अस सर माओ त्से तुंग. (बुटका माओ खुर्चीवर उभा राहून हात वर करतो) एक उत्तुंग व्यक्तिमत्व. असं म्हणतात, उंचावरून उडणारी सगळी वटवाघळं माओजींनी फस्त केल्याने वटवाघळांचा वंश विनाश होतो अशी भीती वाटायला लागलेली..

माओ: आय डिड डू द 'बॅटिं'ग!

हिटलर: अरे बॅट्समॅन! पण भीती कशाला? अनार्य वटवाघळं. राहिली काय नि गेली काय!

किम जोंग इल: बट यू नो, आय हॅव अ डिफरन्ट व्ह्यू! आपल्याला आपल्या क्रौर्याविष्कारासाठी प्रजा पूर्ण नष्ट करून चालत

नाही! वुई नीड टू हॅव देम! नाहीतर आपली दहशत कोणावर चालणार? न रहेगा बांस तो कैसे बजेगी बासुरी? नो वटवाघूळ, नो सूप! न रहेगी प्रजा, न बजेगा दहशतका बाजा. जस्ट किल वन अँड शंभर लोकांची फाटते..

किम यो जोंग: धिस इज व्हेअर द एक्स्पिरियन्स काऊंट्स! आजचे आपले हे संमेलन त्याच उद्देशाने घेतले जात आहे. हुकुमशाहीचे पैलू उलगडून त्याला हीऱ्यासारखी कटिंग एज मिळावी.. वुई आर प्रिव्हिलेज्ड टू हॅव द इराकियन ग्रेट डिक्टेटर श्री.सद्दामजी हुसेनजी..

सद्दाम हुसेन: (हात वर करत..) हॅलो फ्रेंड्स.. मुद्दाम उद्दामपणा करणाऱ्या सद्दामचा सलाम!

किम यो जोंग: नाऊ, लास्ट बट नॉट द लिस्ट, वुई हॅव द स्पॅनिश फुटबॉल फॅन. द वन अँड ओन्ली श्री. फ्रान्सिस्को फ्रँकोजी. फुटबॉलच्या ग्राउंडवरील मृतदेहांचा पडलेला खच पाहून व्यथित होणारे फ्रँकोजी. रक्ताने माखलेल्या ग्राउंडवर फुटबॉल खेळताना कुणाला इजा होऊ नये म्हणून त्यांचे हृदय कळवळायचे. त्यामुळे त्यांनी आदेश काढलेला, फुटबॉल ग्राउंडमध्ये नो रक्तपात. बाकी ठिकाणी मात्र पूर्ण स्वातंत्र्य.

फ्रँको:(हात वर करत..) ब्लडी दोज डेड पीपल! बंदुकीच्या गोळ्या खाऊन मरायचे तर मरायचे आणि मेल्यावर घाबरायचे पण नाहीत. स्टेडियम साफ कोण करणार? त्यांचा बाप? मेलेली कोंबडी आगीला भीत नाही तसेच हे! मेल्यावर मुडदे भीत नाहीत म्हणजे काय? भीती कशी हवी? चोवीस बाय सात.. थ्री सिक्स्टीसिक्स डेज! नो लीप इव्हन इन अ लीप इयर!

किम जोंग उन: व्हेरी ॲप्ट सर. भीती हेच हुकुमशाहीचं चलन आहे. ओळख आहे. युरोप, आफ्रिका, दक्षिण अमेरिका, आशिया अशा विविध खंडांतून आपल्या हुकुमशाहीचा अमीट ठसा उठवलेले, हुकुमशाहीच्या इतिहासात अढळ स्थान मिळवणारे हे डिक्टेटर्स आज उत्तर कोरियाला जागतिक इतिहासात अढळ स्थान मिळावे म्हणून मार्गदर्शन करायला इकडे उपस्थित आहेत. हैल हिटलर म्हणत मी विनंती करतो की श्री.ॲडॉल्फजींनी पुढील सूत्रे हाती घ्यावीत.

हिटलर: सॅल्यूट्टू ऑलॉफ्यू. माय डिअर फ्रेंड्सँड कुलिज.. नो कुलिग्स. अमर्यादित क्रूरता आणि भय या करता काय हवे? ऑर्डिनरी लोकांवर एक्स्ट्रा ऑर्डिनरी दहशत. का? कारण ते ऑर्डिनरी असतात! अँड दे डिझर्व्हे धिस बिकॉज दे आर सर्वसामान्य! ऑर्डिनरी असणं हाच त्यांचा गुन्हा आहे. आणि गुन्ह्याकरता शिक्षा ही मिळालीच पाहिजे. किम जोंग इल म्हणाले त्याप्रमाणे, अमर्यादित क्रूरता मर्यादित लोकांवर

दाखवणे हा हुकुमशाहीचा पाया आहे. त्यासाठी डार्विनच्या सिद्धांताची मदत घेतली पाहिजे..

सद्दाम: डार्विन? च्यामारी! हा कोण नवा डिक्टेटर? नामभी नै सुनेला कभी..

हिटलर: नॉट अ डिक्टेटर. जस्टॅन ऑर्डिनरी सायंटिस्ट! तो सांगून गेलेला 'सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्ट.' सो वुई द डिक्टेटर्स आर फिटेस्ट टू सर्व्हाइव्ह. अँड दोज अदर्स हॅव टू पॅरीस! नो, पेरीश! फक्त आपण लोकांना डिव्हाइड करायचं. आपण आणि ते! ग्रेट 'आपण' सर्व्हाइव्ह होणार नि 'ते' चिरकुटासारखे नाहीसे होणार! दॅट्स द गायडिंग प्रिन्सिपल ऑफ अ डिक्टेटरशिप. आणि डर, भय, भीती, खौफ वगैरे पसरवणे हे हुकुमशहाचे मुलभूत कर्तव्य आहे. आणि आयॅम हॅपी, नॉर्थ कोरियन्स हॅव बॅन्ड लाफिंग हिअर. अरे डरेल तो हसेल काय? लोकांनी हसणं विसरायला हवं! सर्व प्राण्यांत माणूस सोडून कोणी हसतं का? माणसानं तरी कशाला हसायला हवं? काव्यशास्त्रसाहित्य, विनोद आणि विचार आर द एनेमीज ऑफ एनी प्रॉस्परिंग कंट्री. आणि त्याचा रूलर! सो, रूलर्स हॅव टू टेक नेसेसरी स्टेप्स..

पोल पॉट: अँड ॲक्ट लाइक अ स्टेप रूलर! स्टेप मदर असते तशी!

इडी अमीन: फ्रेंड्स, मी काय म्हणतो, जस्ट रिलॅक्स! एक दिवस त्या नरकातून पॅरोलसारखी सुटका मिळाली आहे. तेव्हा..

गडाफी: चिल्ल.. चिल्ल.. इन चिली! पिनोचेट्'स चिली!

पिनोचेट डुलक्या देतोय..

फ्रँको: हा पिनोशेटजी खराखुरा चिल्ल मारतोय! लेट इट बी यारा चिली चिली!

पिनोचेट हलत नाही.

किम जोंग उन: माय फोरफादर्स अँड (किम जोंग इल कडे पाहात) अँड वन फादर, मी समजू शकतोय हा तुमचा नरकवासातून बेबी'ज डे आऊट सारखा दिवस आहे. असं म्हणतात रिटायर्ड लोकांना नॉस्टॅल्जिया जरा जास्तच 'चढतो.' पण आयॅम इन द मिड्स्ट ऑफ अ क्रायसिस! एक्झिस्टेन्शियल क्रायसिस! म्हणूनच तर मी बोलावलंय तुम्हाला..

किम जोंग इल: नॉट्टुवरी माय सन! हे रिटायर्ड हुकुमशहा अजूनही तितकेच तळमळतात त्यांच्या हुकुमशाहीसाठी. मध्येच ते काहीतरी बोलले तरी दॅट्स अ कॉमिकल रिलिफ! आय स्वेअर, दे आर ॲज खूंखार ॲज अर्लीयर! अरे माणसाचं

बेसिक स्ट्रक्चर रिमेन्स इनटॅक्ट! ते काय म्हणतात, सुंभ जळला तरी पीळ जळत नाही! तसंच आहे हे माय सन!

किम जोंग उन: थँक्स डॅड.. सो लेट्स गो अहेड..

हे सुरू असतानाच इकडे किम यो जोंग आपल्या हातातील मोबाईलमध्ये काहीतरी वाचते आहे. पहिल्यांदा थोडी चिंतित दिसते, मग घाबरते, रागावल्यासारखी दिसते. मग एकाएकी ..

किम यो जोंग: सॉरी टू डिसरप्ट कॉमरेड्स. पण परत एक अतिशय भयंकर घटना घडली आहे असा संदेश आहे. आपण इकडे हुकुमशहांच्या अधिकाराबद्दल बोलतोय आणि तिकडे? लोकशाहीचा जहरी कीडा चावलेल्यांची चुळबुळ कितीही प्रयत्न केले तरी थांबत का नाही? लोकशाहीचा किडा चावलेले काही क्षूद्र दहशतवादी जंतू वळवळ करताहेत.. ते दहशतवादी विषारी नाग फणा काढून डसण्याची वाट पाहात आहेत..

किम जोंग उन: सिस, कम टू द पॉइंट! उगाच भाषेचा फुलोरा नि शब्दांचा मनोरा नको. काय झालंय? हिमालय वितळून बुटका झालान की मुंग्यांनी मेरू पर्वत गिळलान?

किम यो जोंग: नाही. याहून भयंकर. (नाटकीपणे) मुंग्यांचं काय? अरे, किड्यामुंग्यांसारखी होलसेल माणसं मारणारे आपण. त्यांनी मेरू पर्वत गिळला तर त्या पर्वतासकट त्यांचा नायनाट करणारे आपण, आपल्या क्रौर्यास न कुठल्या सीमा ना कुठल्या मर्यादा. दहशतीचे जिवंत पुतळे आपण आणि आज.. आज असा दिवस दिसावा? ओ गॉड! आपण कुठे कमी पडतोय? हे हुकुमशाहीच्या देवा! नको अंत पाहूस!

किम जोंग उन: यो! आधी तू त्या टीव्हीवरच्या सिरियल्स बघणं बंद कर! डोन्ट बी नाटकी! त्या टीव्ही सिरियल्स सारखा उगाच ताण ताण ताणतेस सस्पेन्स! आता इकडे एकेकाचे क्लोझ अप्स दाखवशील भयानक संगीतासकट की काय झालं ते सांगशील? की पुढचं थेट, उद्याच्या एपिसोड मध्ये?

किम यो जोंग: तू बोलू देशील तर ना?

किम जोंग उन: मी?

तेवढ्यात दरवाजा उघडून एक शिपाई दोन साध्या दिसणाऱ्या सामान्य नागरिकांना बकोट पकडून आत आणतो नि सगळ्यांसमोर ढकलून देतो.. मग सलाम ठोकत उभा राहतो.. सारे स्तब्ध उभे. किम जोंग उन टॉक टॉक पावलं टाकत पुढे येऊन उभा राहातो.. सगळे

डिक्टेटर्स आजूबाजूला कोंडाळे करून उभे राहतात. पिनोचेट सोडून. तो टेबलावर डुलक्या देत झोपला आहे. बुटका माओ खुर्चीवर उभे राहतो

माओ: धिस आर दोज ब्लडी टेरॉरिस्ट्स? असले?

हिटलर: माओ, नॉट टू बी मिसलेड. दे कम इन ऑल शेप्सँड साइझेस !

स्टालिन: ॲडॉल्फ को थट्टी इयर्स का एक्सपिरियन्स है!

किम जोंग उन: (थोडा वैतागलेला या बडबडीने. पण ते न दाखवता..) हीच का तुझ्या भयंकर कहाणीतील पात्रं यो?

किम यो जोंग: ही. हीच! आपल्या सर्व मेहनतीवर पाणी फेरणारे हे बदमाश.. दहशतवादी! टेररिस्ट्स! साळसूदपणाचा आव आणणारे दुष्ट बेरकी!

किम जोंग उन: आय विल हँडल धिस यो.. (सर्व उपस्थित डिक्टेटरांकडे पाहात..) जंटलमेन..

हिटलर: जंटल? खरंतर नॉट सो जंटल.. मेन..

किम जोंग उन: ओके. सो नॉट सो जंटलमेन. लुक ॲट धिस ॲट्रॉसिटी.

गडाफी: दॅट वॉज धिस पोलपॉट लाटणंवाल्या's कंबोडियन सिटी.. ॲट्रॉसिटी! अरे, आपण लोकानी सगळीकडे ओबे-सिटी बनवायला पाह्यजे. साला ओबे अस ब्लडी सिटिझन्स!

स्टालिन: गडाफी, ही ओबे-सिटीची आयडिया ग्रेट आहे. वुई डिक्टेटर्स आर रियली इमॅजिनेटिव्ह! हुं.. इफ ओन्ली वुई वेअर अलाईव्ह!

इडी अमीन: अरे, जाऊ देत! माझी फिलॉसॉफी आहे, जे गेलं ते गेलं. आता मी आणि माझा नरकवास! उगाच जुने दिवस आठवायचे कशाला? त्यापेक्षा तिकडे आधीच नरकवासात असलेल्यांना नरकाचा अजून जिवंत अनुभव कसा देता येईल याचा विचार करतो मी! लिव्ह इन द मोमेंट यारों!

गडाफी: इडी, तुला ही अध्यात्मिक बाजू आहे आधीपासून. नाहीतर कुणी फिलॉसॉफर डिक्टेटर पाहिला आहे कधी?

मुसोलिनी: डोन्ट वेस्ट टाइम डियर. इकडे समोर दोन खूंखार टेररिस्ट्स आहेत आणि तुम्ही शिळोप्याच्या गप्पा मारताहात? नेशन फर्स्ट! ती म्हण आहे ना.. आधी नेशन मग रेशन! म्हणजे ती इंडियन म्हण आहे ना, आधी पोटोबा मग विठोबा!

किम जोंग उन: यस प्लिज जंटलमेन.. सॉरी नॉन जंटलमेन. मला ह्या क्रायसिसला हँडल करू द्या. नॉर्थ कोरियावर आलेली ही

एक राष्ट्रीय आपत्ती दिसतेय.. इमर्जन्सी! शिपाई, काय केलंय या दहशतवादी नालायकांनी? कुठे आणि कसे सापडले हे?

शिपाई: हुकूम सरकार.. (घाबरत) मी काही नाही केलं सरकार!

किम जोंग उन: ते माहितीय! पण काही न करणं हा देखील गुन्हा आहे ठाऊक आहे ना?

शिपाई: होय सरकार! जो करे उसका भी बुरा, जो न करे उसका भी बुरा..

किम जोंग उन: आता काय झालं ते सांगतोस की..

शिपाई: सांगतो हुजूर. त्या तिथे पलिकडे तिकडे..

किम यो जोंग: दादा, हर्ड धिस साँग? त्या तिथे पलिकडे तिकडे.. माझिया प्रियेचे झोपडे..

किम जोंग उन तिच्याकडे पाहून डोळे वटारतो.

ती गप्प होते. किम जोंग उन शिपायाला पुढे बोल अशी खूण करतो.

शिपाई: तर हुजूर मी तिकडून जात होतो असा तंबाखू मळत.

स्टालिन: गाय छाप? साला आपल्या वेळेला पण होता तो दर्जेदार जर्दा! बाकी सगळं आहे पण त्या नरकात च्यायला तमाकू नाही!

मुसोलिनी: तुला ठाऊक नसेल म्हणून सांगतो, स्वर्गात पण नसणार! त्या इंड्यात पुल देशपांडे नावाचे कुणी द्रष्टा होऊन गेले. त्यांनी सांगून ठेवलंय हे. 'कृष्ण चालले वैकुंठाला राधा विनवी पकडून बाही.. इथे तमाकू खाऊन घे रे, तिथे कन्हय्या तमाकू नाही!'

किम जोंग उन या साइड चर्चेने वैतागत शिपायाला पुढे बोलण्याचा इशारा करतो..

शिपाई: तिकडे ती गुहा आहे त्यातून जोरात आवाज येत होते सरकार..

किम जोंग उन: कसले आवाज? बंदूक? तोफा? मिसाईल्स? की बाँब? अणुबाँब? हायड्रोजन बाँब? की फटाक्यातला.. आपटी बार?

शिपाई: बाँब नाही सरकार! बाँबॉबोंब! हसण्याचा आवाज येत होता सरकार! हास्याचा बाँबस्फोट!

किम जोंग उन: द्याट्स व्हेरी सिरियस.. पुढे?

शिपाई: मी लगेच जिवावर उदार होऊन त्या गुहेत शिरलो आणि ह्या हरामींचं बकोट पकडून इकडे आणलं..

किम जोंग उन: काय? हास्यबंदीच्या प्रथम वर्धापन दिवशी असला दहशतवादी हल्ला? आपल्या राज्यात हे दोघे हसत होते? ते ही लपून छपून? ऐका, नॉट सो जंटलमेन, अगदी काही दिवसांपूर्वी हे असेच झालेलं. आणि आय हॅड टू सॅक्रिफाइस.. टू बुलेट्स टू किल टू टेररिस्ट्स! एक लेखक आणि एक.. हसणारा लाफिंग बुद्धा! सच अ वेस्ट ऑफ बुलेट्स! या टेररिस्टांमागे बुलेट्स तरी किती वाया घालवायच्या?

शिपाई: सरकार, तिकडे हे हसत होते दात काढून. हा हा हा हा असं. पण मी हसत नाहीए सरकार. फक्त दाखवतोय ते कसं हसत होते ते. मी सोत्ता ह्या डोळ्यांनी ऐकलं. नि कानानी पाह्यलं..

किम जोंग उन: शाबास! अजून कशानी काय काय केलंस ते सांगू नकोस.. झडती घे या दोघांची..

शिपाई दोघांचे खिसे तपासतो. एकेकाच्या खिशातून एक कागद काढतो. तो उघडून पाहत किम जोंग उन च्या हातात देतो.

किम जोंग उन: बघू! काय लिहिलंय? सांकेतिक भाषेत? नक्कीच कुण्या लोकशाहीवाद्यांचे बगलबच्चे दिसताहेत. नॉन जंटलमेन, देअर इज नथिंग मोअर ॲट्रॉशियस दॅन धिस ब्लडी लोकशाही! पाहू काय आहे ..

किम यो जोंग: दादा, केअरफुल. कदाचित कविता किंवा गोष्ट असेल. किंवा एखादा विनोद! काव्यशास्त्रविनोद!

किम जोंग इल: याहून घातक या जगात अजून काही नाही बेटा!

किम जोंग उन: आय अंडरस्टँड डॅड. मी जपून वाचतो एकदम..

मनात वाचतो. चेहऱ्यावर हसू फुटतं. ते कष्टाने दाबत..

किम जोंग उन: ओ गॉड! नॉन जंटलमेन, यू वेअर लकी. असली नौबत तुमच्यावर आली नाही. हे हास्य दहशतवादी. 'हास्य आणि साहित्यक्लब' वाले म्हणे! दहशतवादी संघटना आहे

ही! त्यात चोरूनलपून हसतात. काही तर कविता लिहितात. कथाकादंबऱ्या देखील लिहित असतील आपल्या नाकावर टिच्चून हे दहशतवादी? ऐकायचंय काय आहे याच्यावर लिहिलेलं?

पोल पॉट: ऐकव! लेट्स हॅव अ हार्टी लाफ! (कवितेच्या चालीत)
कितीतरी दिवसात नाही मनमुराद हसलो.. कितीतरी दिवसात नाही विनोदा ऐकलो..

मुसोलिनी: पोल, तू विसरलायस डिक्टेटराचा धर्म? अरे, ज्याने कर्दनकाळ म्हणून रडण्याभेकण्याचे आवाज प्रसवले जनतेच्या तोंडून त्यानेच हसण्याच्या आवाजाची गोष्ट करावी? 'कवट्या कवट्या त्या जमवाव्या डिक्टेटर धर्म वाढवावा..' असं ब्रीद असलेला तू?

पोल पॉट: सॉरी बेनीटो! अरे मरून इतकी वर्षं झाली की थोडंफार पूर्वजन्माचं विस्मरण होणारच ना? ऐकव किम जोंग..

किम जोंग उन: या कागदावर लिहिलेला हा विनोद आहे.. ऐका!

तीन मुंग्या एका मागोमाग एक लायनीत जात असतात. दुसरी म्हणते मी पहिलीच्या मागे. तिसरी म्हणते मी दुसरीच्या मागे. तेव्हा पहिली म्हणते मी तिसरीच्या मागे! कसं? काय नॉन जंटलमेन.. एनी आन्सर्स?

गडाफी: पझल्स? नॉट माय कप ऑफ टी!

इडी अमीन: माझा पण! नॉट माय कप ऑफ आफ्रिकन कॉफी. नेव्हर हॅड टी इन माय लाईफ! चहा पिऊन माणूस काळा होतो म्हणे!

किम जोंग उन: यो? एनी गेस?

किम यो जोंग: दादा, ती सर्कलमध्ये जात असतात?

किम जोंग उन: तू ऐकलं नाहीस यो. दे आर इन अ क्यू! पुढे उत्तर दिलंय.. ती खोटं बोलत असते!

उपस्थितांत हसू फुटतं

मुसोलिनी: हँसना मना है हे खरं. पण पोस्ट मॉर्टेम हँसना अलाऊड है!

किम जोंग उन: हसा चकटफू! माझ्या बापाचं काय जातं? (किम जोंग इल कडे पाहात) सॉरी डॅड. पण आमचा नियम सामान्यांसाठी! आता हा दुसरा बाँब. ह्यात नुसता विनोद नाही. तर कविता आहे.

किम यो जोंग: विनोद आणि कविता? म्हणजे डबल बॅरल? डबल बाँब दादा?

किम जोंग इल: केअरफुल किम जोंग उन! मी आणि तुझ्या आजोबांनी कित्येक बाँबगोळे पचवलेले. पण तुझे आजोबा मात्र हसता हसता हर्षवायूने वर गेलेले हे खरं! आयुष्यात कधी हसले नाहीत, एकदा हसले नि घोटाळा झाला.

किम जोंग उन: च्यायला! मी अमर होण्याआधीच (मेल्याचा अभिनय करत)? पण नाही. हा पुरावा आहे ह्या दहशतवाद्यांच्या कृष्णकृत्याचा. जज्ज म्हणून प्राणाची बाजी लावून मला वाचावंच लागेल.. तसा धोका या सर्व उपस्थित आत्म्यांना नाही.. कारण मेन आर मॉर्टल बट देअर आत्माज आरन्ट! एकदा मी इमॉर्टल झालो की.. जाऊ देत, त्याला वेळ आहे! तर ऐका..

एका नदीतीरी । इंद्रधनु तपकीरी
म्हणोनि हाराकिरी । करू नये ।।

इंद्रधनु न सप्तरंग । पाहुनिया दंग
बुडण्याचा चंग । बांधू नये ।।

बना वाचाळ वाचाळ । पायी बांधुनि चाळ

एका देशियाची नाळ । तोडू नये ।।

कुणी जाई दूर देशी । ओलांडूनिया वेशी
त्याशी कुणी दरवेशी । म्हणू नये ।।

या सारे जण यारे । वाहवू वेगळे वारे
त्या कुणी वेडा मारे । बोलू नये ।।

हसा लेको हसा । नका कुणी फसा
हसण्याचा वसा । सोडू नये ।।

नका नका रे उतू । नका रे मातू
घाबरशी असा का तू । डरू नये ।।

या सारे जण यारे । उलथवू येथ सारे
मग देण्या तसे नारे । डरू नये ।।
(चाचरत वाचतो..)

मग देण्या तसे नारे.. डरू नये?

स्टालिन: धिस साउंड्स व्हेरी व्हेरी क्रिटिकल किम जोंग उन.. हा दहशतवाद लगेच उखडून टाकायला हवा! बी ब्रूट अँड अपरूट फ्रॉम द रूट..

हिटलर: यस, अ स्टिच इन टाइम विल सेव्ह नाईन! मी बर्लिन म्युनिसिपाल्टीच्या निवडणुकीत घोषणा देखील दिलेली, वेळेवरती एक टाका, वाचवितो पुढचा धोका!

किम जोंग इल: उन, या उनाड लोकांवर कडक कारवाईखेरीज पर्याय नाही.. आणि बिवेअर. नुसताच बंदुकीच्या गोळीने उडवू नकोस! अरे, हे य:कश्चित सामान्य, एकदा मेले की त्यांना कसलेच भय नसते. मेलेली कोंबडी आगीला भीत नाही त्या प्रमाणे! त्यापेक्षा त्यांना हळूहळू मारावे. टायटन न नूज ग्रॅज्युअली.

किम जोंग उन: होय डॅड. आपल्या 'किम्स एन.के. जनता आदर्श पिळवणूक संहिते'चे आम्ही तंतोतंत पालन करत आलो आहोत. हे दहशतवादी साहित्यकार कुठून भूछत्रासारखे पैदा झालेत कुणास ठाऊक. पण शांतताप्रिय आम्ही या दहशतवादाचा बीमोड करूच. (विचार करत) पण एक शंका.. हे कवी नि लेखक कधीच एकटे दुकटे नसतात.. शिपाई..

शिपाई: होय हुजूर..

किम जोंग उन: शिपाई, कितने आदमी थे रे? अरे, दोघंच हसत होते आणि तिकडे हास्यस्फोटाचा आवाज येत होता? ये बात कुछ हजम नहीं हुई. तुला काय वाटलं, दोन जणांना

पकडलंस तर सरदार खुस होगा? बक्शिसी देगा? बोल..
नक्की काय झालं, बोल? किती जणं होती तिथे?

शिपाई गप्प..

किम जोंग उन: गप्प राहण्याची शिक्षा ठाऊक असेलच तुला..
पंख्याच्या पात्यांवर उलटा टांगून ..

हिटलर: वॉव! ग्रेट!

किम जोंग इल: तू अजून तीच पद्धती वापरतोस बेटा? आयॅम सो
प्राऊड ऑफ यू.

किम जोंग उन: होय डॅड. दे आर इनहेरिटेड अँड टाइम टेस्टेड!
आपल्या संस्कृतीचा वारसा चालवायलाच हवा की नाही?
बोल शिपुर्ड्या..

शिपाई: सॉरी सरकार! अजून तिघे होते. पण ते सुटले..

किम जोंग उन: काय? कसे? त्यांना गोळ्या घालायच्या सोडून.. अरे,
आपल्यावर इतकेही वाईट दिवस तर नाही आलेत ना की
बंदुकीच्या तीन गोळ्याही परवडू नयेत.. काय झालं सांग..
बऱ्या बोलानं सांगतोस की..

शिपाई: सांगतो सरकार.. मी त्या गुहेचं दार हळूच उघडलं. दबकत दबकत आत गेलो. तर काय..?

किम जोंग उन: काय?

शिपाई: पाच जणं तिकडे एकमेकांना जोक सांगत होते. दोघं कविता म्हणत असावेत. मी तो जोक ऐकत बसलो.. मला इतकं हसायला आलं, पण ते हसणं मी दाबून धरलं. इतकं की त्यामुळे पोट दुखलं. डोळ्यांतून पाणी आलं. पुढचं दिसेना झालं. पण.. पण मी त्या य:कश्चित विनोदामुळे यत्किंचितही किंकर्तव्यमूढ नाही झालो..

किम जोंग इल: किंकर्तव्य.. काय तो शब्द! तू काय हायर मराठीचा विद्यार्थी होतास? व्हेरी ओल्ड स्कूल ऑफ थाॅट! वय काय तुझं? आता तशा मराठी शाळाच इतिहासजमा झाल्यात.. केल्यात. कुठे शिकलास?

किम जोंग उन: डॅड, लेट इट बी! ते राहू देत.. पुढे बोल किंकर्तव्यमूढ शिपाया..

शिपाई: त्या गडबडीत या लोकांना कळलं की त्यांच्या आतंकवादी अड्ड्यावर धाड पडली आहे. त्यातले तिघे त्यांच्या वह्या नि पुस्तकांचा स्फोटक मुद्देमाल घेऊन पसार झाले. मी या दोघांचं बकोट पकडलं नि गचांडी वळली नि फरफटत आणलं इकडे ते थेट तुमच्या पायावर सरकार!

माओ: डेंजरस. व्हेरी डेंजरस. रिडिंग, रायटिंग, लाफिंग, थिंकिंग.. हायली डेंजरस ॲक्टिव्हिटिज. किम जोंग उन, यांना असंच नको सोडूस. ग्रिल देम वेल..

किम यो जोंग: दादा, तो नवीन टोस्टर आणू? इट ग्रिल्स व्हेरी फास्ट.. रोस्टेड टेररिस्ट बनवते.. ट्रीटमेंट फॉर देम अँड ट्रीट फॉर ऑल..

गडाफी: अरे सोडायचं नाय! डायरेक्ट ऊप्पर! आम्ही आफ्रिकन एकेक साताठ फुटाचे. एका गोळीत मरतील तर! साला एकाला मारायला दोन तीन गोळ्या वाया घालवायच्या म्हणजे काय? म्हणून हा मीन इडीअमीन मगरी वापरायचा मारायला. बिचाऱ्या भुकेल्या मगरींचं पण पोट भरायचं! भूतदया वगैरे काय हवं की नाय? युगांडापासून नामिबीया, सीरिया सोमालिया, चाड .. सगळीकडे उगाच लोकांचे नाहीत लाड. आम्ही सर्वशक्तिमान. बॉर्न टू रूल. हुकूम पाळा नाहीतर जा देवाघरी. खुल्लमखुल्ला सगळं.

इडी अमीन: मग उगाच कोर्ट कचेरी न पुरावे नाहीत. आपल्याला वाटलं ना एखादा अपराधी आहे, तर लाड नाहीत त्याचे करू. थेट यमसदन न काय! गेला एखादा उगाच! आपली फिलॉसॉफी आहे.. येणारा कधीतरी जाणारच. तेव्हा फिनिश दीज ब्लडी टेररिस्ट्स

पोल पॉट: यस्स. गो फॉर द किल किम. चलाव गोळी, जलाव होळी..

हिटलर: वेट डियर्स! कॉम्रेड किम जोंग उन, वुई नीड टू एक्झामिन धिज बर्गर्स.. आय मीन बेगर्स.. म्हणजे बगर्स.. वेल.. ऑल द डिग्नीटरीज.. सगळ्यांनी मिळून ह्या दोघांना तपासूया. या लोकांचा कायतरी ट्रेट असणार. विल गेट सम क्ल्यूज. आयॅम शुअर.. लाँग टर्मचा विचार करा. हे असले नियम मोडण्याचं सुचतं नि जमतं कसं याचा विचार करा. म्हणजे मग यांच्या बिरादरीतले बाकीचे ओळखता येतील..

हिटलर पुढे जाऊन त्या दोघांकडे पाहात उभा राहतो. मग डोक्यापासून पायापर्यंत, मागून पुढून पाहातो. बाकीचे एकेक करून पाहात मागेपुढे फिरतात. जोंग उन फिरत असताना यो जोंग पुढे येते, त्याच्या खिशातील कंगवा काढून देत त्याला 'ह्याच्यानी डोकं खाजव' अशी खूण करते.

सद्दाम: एकाचे केस काळे नि दुसऱ्याचे पण सेम..

फ्रँको: हॅ. उद्या बोलशील दोघांना दोन नाक, एक हात, दोन कान.. नाय, दोन हात एक नाक..

पोल पॉट: ते पिनोचेटचं लाइफ बेस्ट! स्लिपिंग ब्युटी विदाऊट ड्यूटी!

इडी अमीन: माय फिलासॉफी, उडा देव सालोंको. जस्ट शूट ॲट साईट!

माओ: अरे, नो. लुकॅट द आईज..

किम जोंग इल: गाईज.. बी सिरियस. वुई आर ऑन अ मिशन! नॉट लाइक दोज लोकशाहीवाल्यांचं क-मिशन! वुई हॅव टू गेट द रिझल्ट्स!

हिटलर गंभीरपणे दोघांना तपासता तपासता..

हिटलर: युरेका!

मुसोलिनी: ओह नो! ॲडॉल्फसाठी कुणीतरी टॉवेल आणा.. नाहीतर हा असाच बाहेर पडेल!

हिटलर: आयॅम सिरीयसली सिरियस बेनीटो.. हे बघा. किम जोंग उन, सी धिस..

किम जोंग उन पुढे जाऊन बघायला लागतो. बाकीचे पण पुढे होतात. हिटलर एकेका हाताने दोघांचं नाक पकडत..

हिटलर: बघ! व्हॉट्स कॉमन इन देम? मी विचार करत होतो या लोकशाहीवादी बंडखोरांत काही ना काही कॉमन असणार! असणारच! मी काय म्हणतो ते कळतंय का?

किम जोंग उन: नक्की.. काय?

हिटलर: हे बघ. दोघांचं नाकाचं हाड वाकडं आहे. गेट इट? याचा अर्थ काय? नाकाचं हाड वाकडे असणं आणि देशद्रोह! दे गो हँड इन हँड! धिज टू मे बी अ प्रोटोटाईप ऑफ दीज लोकशाहीवादी टेररिस्टस्!

किम जोंग उन: लॉट टू लर्न फ्रॉम यू सर! सॅल्यूट फॉर धिस!

हिटलर: सो.. क्रुसेड अंगेस्ट द क्रुकेड नोझेस!

किम जोंग उन: मी लगेच कामाला लागेन. ऑपरेशन क्रुकेड नोझ! नो वाकड नाक्या विल बी लेफ्ट अलाइव्ह हिअर!

हिटलर: इतकं बारीक लक्ष घालावं लागतं. नाहीतर, हू नोज, दे विल बी राइट अंडर युवर नोज! राज्य चालवणं सोपं नाही! डिक्टेटर बनणं तर त्याहूनही नाही!

बाकी सगळे: हैल हिटलर! ॲडॉल्फजी आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं!

किम जोंग उन: खरंय सर! नुसता हुकुम चालवला की हुकुमशहा बनत नाही कोणी! तिकडे इंडियात संत रामदास सांगून गेले

तसं.. अखंड रहावे सावधान! म्हणून तर तुम्हांला द ग्रेट डिक्टेटर म्हणतात! पण आता मी यां दोघांना इकडे उडवणार नाही. ब्लड बिकम्स रियली मेसी. अँड आयॅम गोइंग टू ऑर्डर अ रिसर्च. बंदुकीच्या गोळीनेच.. पण रक्त न सांडता.. माणूस मरायला हवा. सायन्सकडे असणारच याचं उत्तर! माझ्याकडे आफ्रिकन हत्ती न मगरींची चैन थोडीच आहे?

मुसोलिनी: पण लोकांचे स्वातंत्र्य हत्तीच्या पायाखाली तुडवणारी तुझी मगरमिठी.. ती तर आहे!

किम जोंग उन: थँक्स फॉर द कॉम्प्लिमेंट सर! शिपाई, घेऊन जा दोघांना.

शिपाई दोघांना पकडून ओढत बाहेर घेऊन जातो.

किम जोंग उन: लेट्स गेट बॅक टू अवर वर्क..

सगळे आपापल्या खुर्चीवर बसतात.

किम जोंग उन: हुं. गेले ते देशद्रोही नजरेसमोरून. जगातूनही जातील. पण .. (स्वगत म्हटल्यासारखा, उद्वेगाने..) शेळी जाते जिवानिशी आणि हे काय? पण आयॅम नॉट अ शेळी! मी वाघ, नाहीतर चित्ता! माझा जीव तीळ तीळ तुटतो जगाच्या

शांततेसाठी. जिवाचं रान करावं मी उत्तर कोरियाला बंदिस्त ठेवण्यासाठी. पौर्वात्य नि पाश्चिमात्य, उत्तर की दक्षिण, की अगदी परग्रह.. सूर्य चंद्र.. कोठल्याच देशाप्रदेशातून कसलेच वारे येऊ नयेत इथे म्हणून पराकाष्ठा करावी नि आपल्याच देशातील देशद्रोह्यांनी त्याच्याच विरोधात काम करावे? या वाघानं जावं जिवानिशी नि यांनी? सगळा सत्यानाश करण्यास दबा धरून बसावे? त्या लोकशाहीवाल्यांना सांगा, पाचपाच वर्षांत इलेक्शनचा बहाणा बनवून नवनवीन कुणी सत्तेचा सोपान चढत असेल तर यासारखा पळपुटेपणा नाही. बेजबाबदारपणा नाही. या ब्लडी लोकशाहीवाल्यांना काय वाटते? सत्ता ही उपभोगाची बाब आहे? नो! सत्ता ही राबवण्यासाठी आहे, गाजवण्यासाठी आहे नि तिच्यासाठी अहर्निश मेहनत करावी लागते. डोळ्यात तेल घालून देशद्रोह्यांकडे नजर ठेवावी लागते. जो जो सत्ताधीशांचा विरोध करेल तो तो देशद्रोही अशी व्याख्या रूढ करावी लागते. मेहनत किती? पण कठोर परिश्रमास पर्याय नाही. नाहीच! आणि हे कसले डिंडिम वाजवतात? जनता जनार्दन काय नि मानवी हक्क काय! समृद्धी काय नि शांतता काय! नुसती पांढरी कबुतरं उडवून शांतता येत नाही. लक्षात घ्या दुनियावाल्यांनो, एक हुकुमशहाच असतो खरा शांतताप्रेमी.. जो गरज पडल्यास याच कबुतरांना छऱ्यांनी उडवतो..

शांततेसाठी. सत्तासनावर चढण्याच्या आधी आणि नंतर त्याच्या ध्यानी मनी स्वप्नी असतो तो देशच! जस्ट इमॅजिन दॅट ब्लडी डेमॉक्रसी! तो निवडून आलेला म्हणे नेता! तो निर्णय घेणार. लोकांना नाही पटलं तर ते उगाच मोर्चे काढणार, धरणे धरणार, उपोषणं करणार! कोणाचा पायपोस कोणात नाही. गोंधळ गोंगाट नुसता. डेमॉक्रसी इज नॉयझी आणि ती म्हणे आदर्श व्यवस्था? आणि माझा उत्तर कोरिया पहा! टाचणी पड शांतता! कुठे हुं नाही की चुं नाही! खरंतर शांततेसाठीचं नोबेल प्राईझ माझ्यासारख्या हुकुमशहालाच.. मलाच मिळायला हवं! पण इकडे काय? एखाद दोन लोकशाहीवादी गांडुळे वळवळतात. त्यासाठीच तर आम्हाला सदैव जागृत आणि जागरूक रहावे लागते. यांना दिली ओसरी आणि हे हातपाय पसरी. तेवढ्यासाठीच मला हवा आहे उत्तर कोरियन सत्तेचा अमरपट्टा! दमनकारी हुकुमशाहीच खरी कल्याणकारी आणि जगभरात चर्चा कसली? लोकशाहीची? (डोळे पुसतो..)

हिटलर: किम जोंग उन.. अगदी हृदयद्रावक. आज इथे आम्ही आलो ते जगाच्या कल्याणासाठी. आत्म्यांना रडण्याची सोय नाही नाहीतर तुझे भाषण ऐकून आमचेही डोळे पाणावले असते. (समोरचा टिशू पेपर देत..) उगी उगी..

माओ: हुकुमशाहीसाठीची तुझी तगमग पाहिली पोरा. किम जोंग इल, युवर सन इज अ जेम ऑफ द डिक्टेटर्स. आय सी

अराउंड द वर्ल्ड. आताही काही तसे आहेत हुकुमशहा. आमचा क्षी घ्या नाहीतर रशियन पुतीन घ्या. पण दोघांनाही इलेक्शनीच्या कुबड्या लागतात हुकुमशाहीसाठी. किम जोंग उन इज अ प्युअर सोल! आणि यस, इलेक्शन नव्हे, तर इलेक-शनी! कुंडलीत शनी मागे लागलाय जणू!

सद्दाम: हुं. शनी! धिस ॲस्ट्राॅलॉजी इज ए स्कॅम!

मुसोलिनी: सद्दाम, तू काय रे स्कॅम स्कॅम करतोस? अरे, वुई द हुकुमशहास नेव्हर डू एनी स्कॅम. ती स्कॅमची भीती निवडून येणाऱ्या नेत्यांना! ते स्कॅम तर करतात पण लपून छपून. नि मग चौकशीचा फार्स करण्यात वेळ घालवतात. आपण? अवर्स इज ॲन ओपन बुक! ब्लडी हू कॅन डेअर टू क्वेश्चन अस? सो नो क्वेश्चन ऑफ एनी स्कॅम!

स्टालिन: खरंय! किम जोंग उन एक आदर्श हुकुमशहा आहे! हां, आपण सगळे समकालीन असतो तर लागली असती स्पर्धा, कोण जास्त कर्दनकाळ म्हणून!

पोल पॉट: इथे आपल्यात झगडा होईल! तुम्हाला काय वाटलं तुम्हीच क्रूरतेचे पुतळे? कंबोडियात मी काय मागे नव्हतो!

गडाफी: नो कवटीबहाद्दर! आफ्रिकन्स आर द बेस्ट! वुई फिड द क्रोक्स अँड डोन्ट शेड क्रोकोडाइल टियर्स! लूक ॲट द इनोव्हेशन. द इथियोपियन वे.. रक्तहीन हिंसा. भूकबळी,

तेही हजारो लाखोंने. कर्दनकाळ म्हणून आम्ही कुठे कमी आहोत?

किम जोंग इल: अरे, डोन्ट फाइट. नो डिस्प्यूट्स..

स्टालिन: खरंय! मी तर म्हणेन, जगातील सर्व डिक्टेटरांनो एक व्हा! असं सांगणारा कार्लनंतर मीच पहिला! आता आपण तर नाही आहोत स्पर्धेत तेव्हा सध्या किम जोंग उन इज ॲन अनडिस्प्युटेड नंबर वन!

मुसोलिनी: व्हेरी ट्रू!

स्टालिन: व्हॉट इज 'व्हेरी ट्रू' बेनीटो? नुसता ट्रू बोलून चालत नाही काय?

सद्दाम: व्हेरी ट्रू!

फ्रँको: दॅट इज अ सेल्फ गोल सद्दाम! ट्रू म्हणजे ट्रू! व्हेरी ट्रू म्हणजे पिवळा पीतांबर!

किम जोंग इल: अरे, शब्द शब्द जपून वापरायला आपण ऑर्डिनरी सिटिझन आहोत? बेनीटो, बी बिनधास्त आणि से व्हेरी ट्रू!

किम जोंग उन: माय फादर अँड अँसेस्टर्स. शब्दच्छल नको. छल नि छळ करायचा तर आपल्या हाती जनता आहे, विरोधक आहेत. देवाच्या दयेने ह्यात कमी नाही काही.. पण

लोकशाहीच्या नुसत्या नावानेही माझी तळपायाची आग मस्तकात जाते.

किम यो जोंग: त्रागा करू नकोस ब्रो. मी पाहिलंय तिकडे इंड्यात नवरत्न तेल मिळतं. ते चोळून देईन डोक्यावर. म्हणजे डोकं शांत राहून झोप ही शांत लागेल!

स्टालिन: दॅट्स प्रकाशचे माक्याचे आयुर्वेदिक केश तेल डियर! नॉट द्याट नवरतन कुर्मा ऑर समथिंग!

किम जोंग उन: लेट्स कम बॅक टू द पॉइंट. सो, या लोकशाहीचं काय करायचं? हे भूत कसं उतरवायचं? 'लोकांच्या दमना आपल्या विभूती' असतील तर हे मधून मधून वाहणारे लोकशाहीचे वारे अडवायचे कसे? आणि कुठे कुठे? पाणी अडवता येतं धरणं बांधून. पण वाहत्या वाऱ्यांचं काय करायचं? विचाराचं काय करायचं? ब्लडी इंटरनेट हॅज चेंज्ड एव्हरीथिंग! इट हॅज गॉट द कंट्रीज नियरर.. मग साला एका डोक्यातल्या आयडिया दुसऱ्याच्या डोक्यात! एकाच्या डोक्यातून दुसऱ्याच्या डोक्यात पसराव्या तशा ह्या लोकशाहीच्या उवा पसरतात. व्यक्ती आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणे! हुं! खाजवून खरूज काढतात साले!

किम जोंग इल: आय कॅन अंडरस्टँड माय सन..

किम जोंग उन: रक्त उसळतं माझं विचार करून डॅड. कुठे कमी पडतेय दहशत? व्हॉट डू आय लॅक? कां एवढ्या भीतीनंतरही लोक फक्त हसण्यासाठी जीव धोक्यात घालतात? इज माय मॉडेल फेलिंग? लाइक माय ॲन्सेस्टर्स आयॅम अँड विल रिमेन द इटर्नल प्रेसिडंट! तेव्हा एन.के. इज इक्वल टू किम्स! आम्हा किम्सची हीच स्कीम आहे! तर मी दीर्घायुष्यासाठी काय करावं? ह्या कायदा न जुमानणाऱ्या दहशतवाद्यांना कसं वठणीवर आणावं?

किम जोंग इल: डोन्ट वरी माय सन..

किम जोंग उन: पूर्ण उत्तर कोरियात दोनच प्रकारचे लोक आहेत .. बहुसंख्य.. माझे समर्थक आणि थोडेसे उरलेले.. विरोधक. स्वत:स शहाणे समजणारे दीड शहाणे! देशद्रोही. संख्येने कमी पण अतिधोकादायक. म्हणूनच तर सदैव सतर्क रहावंच लागतं. तशी गाढवंच निपजवलीत मी इकडे. कित्येक तर माझे गुणगानच दिवसरात्र करतात. माझ्याविरूद्ध बोलू पाहणाऱ्यांचाही परस्परच समाचार घेतात. पण लोकांचं गाढवीकरण हा एक कलमी कार्यक्रम जरी केला तरीही तुम्हा सर्वांसारखा एक दिवस मृत्यू मला गाठेल आणि दॅट विल बी दी एंड. बाकी सर्व दुनिया घाबरते आपल्याला, पण ब्लडी दॅट यमराज! तो काय रेड्यावरनं यायला घाबरत नाही!

हिटलर: खरंय किम जोंग उन. आपल्या सर्वांना मरावंच लागतं एक दिवस. इव्हन आय डाइड देन, अँड हाऊ! माय इव्हा अँड मी.. माय स्वीट हार्ट. आजही आठवण आली की कसंसं होतंय. माझी इव्हा ब्राऊन! माझं नुसतं नाव घेतलं की तिचे गोरे गाल लाजून ब्राऊन व्हायचे! पण जग किती पार्शियल आहे! रोमिओ जुलिएट नि लैला मजनू.. शीरी फरहाद.. कितीतरी लव्ह स्टोऱ्या. लोक सांगतात.. ऐकवतात.. पण कुणी सांगतं इव्हा ॲडॉल्फची अमर प्रेमकहाणी? वुई वेअर टुगेदर फॉर इयर्स! मग बर्लिनमधल्या बंकरमध्ये लपलेलो तर इव्हा म्हणाली, ॲडॉल्फ, आय वाँट टू डाय ॲज अ सुहागन! यू आर माय पतिपरमेश्वर! माय गॉड! कुलीन आर्य नारी ती! कुठला हिंदी पिक्चर पाहिलेला आय डोन्ट नो! प्युअर सोल! आम्ही मेलो त्याच्या आदल्या दिवशी वुई गॉट मॅरीड! म्हटलं, माँग में शेंदूर भरून मरायचंय तुला? तर इव्हा म्हणाली, ॲडू, शेंदूर नव्हे रे! सिंदूर! अशी होती ती. तिनं सायनाइड खाल्लं. मी विचारलं, कडू आहे का गं फार? पण ते सांगायच्या आत ती गेली जग सोडून. कडू गोष्टींना भितो फार मी. त्यामुळे कारल्याची भाजी कधी खाल्ली नाही. आई ओरडून ओरडून सांगायची तरीपण. पण म्हटलं आता जाता जाता तोंड कडू करून कशाला जा? मग सायनाइडच्याऐवजी घातली

स्वत:च्या डोक्यात गोळी! पण जगात कधी इव्हा ॲडॉल्फची अमर कहाणी सांगेल कुणी?

मुसोलिनी: अरे जुलियस सीझर हॅड टू डाय लाइक धिस. इव्हन माय क्लॅरा अँड मी.. दोज बुल्स किल्ड अस विथ बुलेट्स! चाळणी झाली आमची नि दुसऱ्या दिवशीच्या बुलेटिन्स मध्ये त्याचे फोटो! बुल.. बुलेट्स.. बुलेटिन! हुं. आणि संपली ती प्रेमकहाणी..

इडी अमीन: अरे, आपली साली मौत अशीच लिहिलेली. दुनिया अशीच आहे. इनकन्सिडरेट. साला पूर्ण लाइफ डिव्होट टू द कंट्री, जगाची लोकसंख्या वाढू नये म्हणून मर मर मरायचं आणि कुत्र्याच्या मौतीने आपणच मरायचं? आपण नसतो तर जस्ट इमॅजिन! वीस चाळीस कोटी लोक जिवंत असते! अर्थ वुड हॅव बीन सो क्राऊडेड!

सद्दाम हुसेन: साला हिटलर, मला सांगितलं असतंस तर तुझी लव्हस्टोरी लिहिली नसती? ॲडामिव्हा: लव्ह इन बर्लिन बंकर! माझ्या जबिव्हा अँड द किंग सारखी बेस्ट सेलर झाली असती ती!

गडाफी: सद्दाम, इव्हन आय युइड टू राईट..

सद्दाम हुसेन: आय नो! तुझ्या लघुकथा! पोरं तुझ्या लघुकथा वाचून चड्डीत लघुशंका करायची म्हणे! तुला पाहिलं की यात काय शंका नाय वाटत गडाफी! गडाफी! सिर्फ नाम है काफी!

स्टालिन: लिहिण्यात काय आहे एवढं? तशा मी देखील कविता लिहायचो! 'रात्रीच्या अंधारात येऊ दे फक्त बंदुकीचा प्रकाश.. आणि उजळून दिसू देत तोफांच्या प्रकाशात कामगारांची खपाटीला गेलेली पोटं..'

मुसोलिनी: फुल्ल 'मार्क्स' टू यू जोसेफ!

इडी अमीन: ओह! साले तुम्ही लोक! अरे, असला माणूसपणा कुठून येतो तुमच्यात? फालतू गोष्टीत वेळ वाया घालवता? एकेक क्षणी एकेक माणूस मारायचा. अरे, माझी फिलॉसॉफी आहे तशी. लाइफ इज सो शॉर्ट अँड सो मेनी मेन टू किल! तर यु गांडा लोक समय वेस्ट करू नको.. टॉर्चर.. इज द मोट्टो.. नायतर बसतात रिकामटेकडे लोक कथा कविता लिहित. अरे हॅट!

माओ: आय डोन्ट ॲग्री! अरे इडी, तू अँग्री होऊ नको! डिक्टेटर झाला तरी तो माणूसच का नाय? कधीतरी माणूसपणा येतो उफाळून. इतका तरी अलावन्स द्यायला पाहिजे यार! नायतर उद्या म्हणशील, हा हुकुमशहा गाणं बोलला.. घाल त्याला गोळी!

किम जोंग इल: खरंय! अरे, वुई आर बॉर्न टू किल! दोज डेमॉक्रसीवालाज् अँड अपोनंट्स!

पोल पॉट: डेमॉक्रसी? नो! डेमॉक्रशी! क्रश दोज डिमन्स!

गडाफी: यस्स! पोल तू पोलपॉट लाटणं घेऊन लाट सगळ्यांना सपाट!

पोल पॉट: ऑफकोर्स आय डिड! घाबरतो का काय!

इडी अमीन: अरे, मी म्हणतो विचार करण्यात वेळ दवडू नये. लाइफ इज टू शॉर्ट! जस्ट साईट अँड शूट! हाय काय अन नाय काय! दोनचार चुकीचे मारले गेले तर..

गडाफी: हू केअर्स? एवढ्या लाख न कोटी माणसात चारदोन इकडेतिकडे उगाच मरायची का नाही? लिटल् मार्जिन ऑफ एरर! ती ही फॉर द सेक ऑफ द कंट्री!

किम जोंग उन: बट गाईज, ओपन युवर आईज! सध्याचा इश्यू आहे तो, हाऊ डू आय बिकम अ बिगर न्यूसन्स अँड दॅट टू फॉर अ व्हेरी लाँग पिरियड ऑफ टाइम! यू ऑल आर इममॉर्टल सोल्स! जगभर कुठे ना कुठे हुकुमशहा नि त्याची हुकुमशाही असले विषय निघतात नि त्यात तुमच्या आठवणी निघतात. दररोज तुमची नावं इकडे निघतच असतात. तिकडे नरकात

तुम्हाला उचक्या लागतात का? आय डोन्ट नो! बट यू ऑल आर इममॉर्टल इन दॅट सेन्स ॲज वेल!

मुसोलिनी: यू आर मेकिंग मी सेंटिमेंटल किम. मला वाटतं की असं करून जावं काम की अनंत काळ आठवण काढत रहावी दुनियेनं.

हिटलर: यस फ्रेंडस, आपण सगळे द ग्रेट डिटेक्टर्स.. नो.. ग्रेट डिक्टेटर्स. एकेकाचं नाव काढलं की लोकं अजूनही घाबरतात. कर्दनकाळ नि क्रूरकर्मा. दमनकारी डिक्टेटरशाही इज द बेस्ट.. आपल्यासाठी. नॉट दॅट सो कॉल्ड कल्याणकारी लोकशाही!

मुसोलिनी: आणि ही लोकशाही काय आहे? व्हॉट्स दॅट? लोकांचा आणि राज्य चालवण्याशी संबंध काय?

स्टालिन: एकेक नखरे अन काय! अरे, राज्यं आपण नाही केली? पण लोकांना नाही विचारायला गेलो.. अरे, लोक हो, तुम्हाला कोण हवंय राज्य करायला?

फ्रँको: होय! ब्लडी लोकशाहीवाले! मतांची भीक मागत फिरतात. किक देम लाइक अ फुटबॉल .. ब्लडी फूल्स!

हिटलर: होय! मी पण निवडून आलेलो नि नंतर निवडून निवडून मारली लोकं! आपण इतके भारी तरी आपली सद्दी संपली

आणि गद्दी गेली. तसं किम जोंग उनचं होऊ नये. इटर्नल प्रेसिडेंट म्हणून त्याने वर्षानुवर्षं, नव्हे युगानुयुगं राज्य चालवावं..

बाहेरून बशर अल असाद घाईघाईने आत येत..

बशर अल असाद: सॉरी, थोडा उशीर झाला. पण मे आय कम इन?

स्टालिन: यू आर ऑलरेडी इन मॅन! अजून किती आत येणार? पण कोण तू?

किम जोंग उन: गाईज, ही इज दी एक्स सीरियन डिक्टेटर. डॉक्टर बशर अल असाद.

बशर अल असाद: हॅलो फ्रेंड्स! सध्या रशियात असतो मी. ब्लडी सिरियन्स! मला पळून जावं लागलं. पुतीनभय्यांनी सांभाळलं म्हणून बरं. किम जोंग उनचा मेसेज आला तर भय्या म्हणाले, डिक्टेटर तितुका मेळवावा, डिक्टेटर धर्म वाढवावा! मोठ्या गुप्तपणे पुतीनभय्याने पोहोचवायची व्यवस्था केली इकडे. त्यात थोडा उशीर झाला!

माओ: वेलकम डॉक्टरसाब! अरे चलता है भाय! उशीर झाला म्हणून शिर पटकावून कशाला घेतो? अरे, वुई द डिक्टेटर्स आर

सार्वभौम! कोणाला उत्तर द्यायला बांधील नाय आपण! ती थेरं तिकडे.. लोकशाहीत!

बशर अल असाद: थ्यँक्स टू ऑल ऑफ यू! खूप दिवसात कुठे बाहेर पडता आलं. सिरियातून पळालो! जान बची सो लाखो पाए!

मुसोलिनी: आणि आता लौटके बुद्धु घर पर आए!

बशर अल असाद: बुद्धु असो की बुद्धिमान, जान है तो ही जहान है!

हिटलर: तेच डिस्कशन सुरू आहे. हुकुमशहांनी मरावंच का? वाटतं, परत जन्म घ्यावा नि जर्मनीला परत ग्रेट बनवावं.. पण ते नाही होणार आता.. इकडे आपला रूळ, आय मीन रूल चालत नाही.

किम जोंग इल: च्यामारी! इतकं डिस्कशन आयुष्यात कधी नाय केलं आपण!

सद्दाम हुसेन: यस्स. चट डिसीजन, पट ठो ठो! उडाव एकेकको साला! हाय काय नि नाय काय!

हिटलर: सिरियात तू कर्दनकाळ होतास म्हणे डॉक्टर?

बशर अल असाद: नाही.. तसं नाही. तुम्ही पण ना मला हरभऱ्याच्या झाडावर चढवतात ॲडॉल्फजी. बट सी द आयरनी, साऱ्या देशाला मरणाचं भय दाखवणाऱ्याला मात्र मरण चुकवता येऊ नये? जर मरण्याची भीती नसती तर पळालो असतो का

सिरीयातून? मला वाटतं आपण सगळ्यांनी मिळून एक लाइफ ग्यारंटी मिळवायला हवी.. लाइक वुई ऑल हॅड गॅरंटीड ॲट्रॉसिटिज फॉर अवर सिटीझन्स!

पोल पॉट: ॲट्रॉसिटी? दॅट्स माय कॉपीराईट!

स्टालिन: राईट! ती सिटी कंबोडियात. ॲट्रॉसिटी म्हणजे हुकुमशहाचा राईट! च्यामारी! आपण तर सगळे कधीच डेड झालो. एकदा मेलो की परत येता येत नाही. मग आपलं काम कोण पुढे नेणार? लाइक ॲडॉल्फ. ही हॅड टू क्लिन्स द नेशन.. तर किम जोंग उन.. त्याचं काम पुढे सुरू राहिलं पाहिजे.

बशर अल असाद: बिइंग अ मेडिको मी सांगतो, सायन्स विल हॅव द आन्सर!

सद्दाम हुसेन: काय पण सांगतो तू डॉक्टर! ब्लडी सायन्स इज अ स्कॅम!

स्टालिन: नो! सद्दाम, ॲटमबाँब पण सायन्सनेच बनवला. आपल्या बंदुका नि बाँब नि रणगाडे.. सायन्सनेच बनवले. सो, सायन्स विल हॅव द आन्सर.. आपल्यासारख्या डिक्टेटर्सना सायन्सची मदत घेऊन इममॉर्टल होता आलं पाहिजे. व्हाय डू वुई नीड टू डाय? प्रोग्रेस एवढी झालीय.. शास्त्र पुढे गेलंय..

हिटलर: यस्स. आय ॲग्री. इमॅजिन द वर्ल्ड.. आपण सगळे जिवंत असतो अजून तर..

किम जोंग उन: इमॅजिन! पण नाही च्यायला! मी तर जिवंतच आहे अजून! सो इमॅजिन, मी अमर झालो.. तर?

बशर अल असाद: अर्थात, सायन्स हॅज ऑल द आन्सर्स! लाइक ऑर्गन ट्रान्सप्लांट. शास्त्र इतक्या वेगाने पुढं जातंय. तो दिवस दूर नाही जेव्हा माणूस मरणाला चकवून पुढे जाईल.

किम जोंग उन: म्हणजे यमराजाला ठेंगा? एक डॉक्टर म्हणतोय .. तर तसंच असणार! पण.. (स्वत:शीच) क्लोन बनवण्यात झाली तशी चूक तर होणार नाही? नो! तीच एक आशा आहे! मी अमर होणार! होणारच!

रंगमंचावर अंधार होतो. परत उजेड होतो तेव्हा मधल्या टेबलावर किम जोंग उन आडवा पडला आहे. ऑपरेशन टेबलावर (ओटी) झोपल्यासारखा. वरून ऑपरेशन साठी वापरतात तसे दिवे. बाजूला बशर अल असाद ओटी च्या कपड्यांत. टोपी, मास्क लावून. त्याच्या बाजूला किम यो जोंग नर्सच्या पोशाखात. ती देखील मास्क मध्ये. दोघांच्या हातात ग्लव्हज. बशीर टेबलाजवळ वाकून ऑपरेशन करत असल्यासारखा. हातात स्कालपेल. किम जोंग उन त्याच्या

मिलिटरी वेशातच, फक्त वर हिरवी चादर, त्यातून पोटावर मोठे वर्तुळाकार गोल कापलेला, जिथे ऑपरेशन करायचे आहे त्या भागी.. बाजूला हिटलर, स्टालिन, मुसोलिनी हातावर हात धरून उभे आहेत.

किम जोंग उन: डॉ.बशर.. रेडी?

बशर अल असाद: नॉट्टु वरी जनरल. इन जनरल एव्हरी थिंग इन ऑर्डर अँड ॲज पर युवर ऑर्डर!

किम जोंग उन: पण गॅरंटी आहे ना?

बशर अल असाद: अर्थात! गॅरंटी. वॉरंटी सुद्धा! रिप्लेसमेंट वॉरंटी. (जाहिरातीच्या सुरात) आम्ही उच्चतम गुणवत्तेचे आणि कंपनीने प्रमाणित स्पेअर पार्ट्स वापरतो. क्वालिटीची ग्यारंटी.. आणि सहज उपलब्धता म्हणजे बीएसपी! बशर अल असाद बॉडी स्पेअर पार्ट्स. नेहमी बशर स्पेअर पार्ट्सचाच आग्रह धरा. टिंग टॉंग..

किम जोंग उन: म्हणजे मी योग्य ठिकाणी आलोय!

बशर अल असाद: अर्थात. थट्टी इयर्स का एक्स्पिरियन्स है! सुरू करूया? सिस्टर यो सबकुछ तयार है?

किम यो जोंग: यस्स सर. पण मला वाटतं जोंग उन चा मेंदू बदला पहिल्यांदा!

किम जोंग उन: यो. एकदा हे ऑपरेशन होऊन जाऊ देत. बघून घेईन. आहे लहान बहीण पण डोक्यावर चढून बसलीय..

हिटलर: अरे डॉक्टर सुरू कर.. फोट पाड, नव्हे, पोट फाड पहिलं. जे दिसेल ते बदल. जुनं बदलून नवीन!

स्टालिन: आय ॲग्री! नवनवीन अवयव बसवून घ्यायचे म्हणजे नो एजिंग!

मुसोलिनी: दॅट विल गिव्ह हिम द एज!

किम जोंग उन: यस्स. मी वाट बघतोय आतुरतेने. नवीन अवयव नवीन उत्साह.

बशर अल असाद: गाईज, लेट मी स्टार्ट. हे काम जरा लक्ष देऊन करावं लागतं गड्यांनो. सो लेट मी कॉन्सन्ट्रेट. पण मैं हूं ना! मी स्वत:च स्वत:चं करू शकत नाही ऑपरेशन म्हणून, नाहीतर मी पण बदलले असते माझे अवयव. (जाहिरातीच्या सुरात) बीएसपीचा युएसपी! खात्रीलायक क्वालिटी आणि कमी दाम.. बीएसपी बॉडी पार्टस, एकही नाम! अवयव प्रत्यारोपणात एकच खात्रीचे नाव, बशर अल असाद! एकदा येऊन असाद चा प्रसाद घ्या! टिंग टाँग.

किम यो जोंग: अरे, ॲड्स इकडे पण?

बशर अल असाद: यस्सर. म्हणून तर आम्ही इतक्या स्वस्तात स्पेअर पार्ट्स विकू शकतो!

किम जोंग उन: वॉव! रेडी, स्टेडी.. गो..

बशर अल असाद: (*पोटावर स्कालपेल फिरवत मॅनहोलचं झाकण उघडल्यासारखं पोट उघडतो..*)

हे उघडलं पोट!

हिटलर, स्टालिन, मुसोलिनी 'पाहू तरी काय' म्हणत आत डोकावून पाहातात.

मुसोलिनी: आय कॅन सी, याच्या पोटात कितीतरी सिक्रेट्स आहेत! प्रेसिडेंट आहे देशाचा तर सिक्रेट्स असणारच!

स्टालिन: साला डिक्टेटर 'आतून' कसा दिसतो ते पहिल्यांदा पाहतोय!

हिटलर: मी पण!

किम यो जोंग:(पोटात डोकावत..) माझं काही बरं झालं दुखतं ते याचं पोट कसं आहे ते पाहून घेते.. आतल्या गाठीचा कुठचा! सर, ती आतली गाठ दाखवा..

किम जोंग उन: मला ऐकू येतंय सगळं यो..

बशर अल असाद: सिस्टर यो.. पोट उघडलं आहे. किडन्या आल्यात? बघ, ही जनरल जोंग उनची डावी किडनी पंक्चर झालीय. साब, पंच्चर बनाऊं की नया टायर? किम जोंग, यू आर लकी! सध्या आमच्याकडे किडन्यांवर ऑफर आहे. बो गो! बाय वन गेट वन! डाव्या किडनीवर उजवी फ्री! आणि उजव्या किडनीवर डावी फ्री!

किम जोंग उन: मग दोन्ही फ्री मधल्या बसव! वाचलेल्या पैशात नवीन बुलेट्स घेईन! किम बुलेट फॉर ऑल योजना! माझी नवीन घोषणा.. माय वॉलेट.. सबको बुलेट!

बशर अल असाद: ओके जनरल! दॅट्स ग्रेट! सिस्टर यो, गेट द किडनीस. बसवून टाकू. हाय काय न नाय काय!

किम यो जोंग: शिपाई, ते अॅमॅझाॅनचं पार्सल आण..

शिपाई एक बॉक्स आणतो. किम यो जोंग तो उघडते. दोन किडन्या काढून बशर कडे देत..

किम यो जोंग: घ्या सर. मस्त दिसताहेत किडन्या! राजमा आठवतो किडन्या पाहून!

बशर अल असाद: यस्स. वुई स्पेशलाइझ इन किडनीज! त्या इकडे ठेवतो आत. नंतर एकत्र शिवू. नाऊ लेट मी सी द लिव्हर.. सिस्टर यो, ते लिव्हर आणा..

किम यो जोंग: शिपाई, तो लिव्हरचा खोका आण ..

शिपाई एक बॉक्स आणतो.

किम यो जोंग: तो हिंदुस्तान लीव्हरचा नाही रे बाबा.. त्यात दादाचे लाइफबॉय साबण आहेत! तंदुरूस्तीची रक्षा होईल म्हणून होलसेल मागवतो तो! तो दुसरा खोका आण.

शिपाई दुसरा खोका आणतो. त्यातून लिव्हर काढत..

किम यो जोंग: हे घ्या डॉक्टर. यकृत नवीन, किडनी नवीन.. जोंग उन, मी तुला नंतर दहा दहा बुक्के मारणार आहे.. न्यू पिंच! लेट धिस ट्रान्सप्लांट गेट ओव्हर!

बशर अल असाद ते लिव्हर पोटात ठेवत..

बशर अल असाद: किंचित मोठं दिसतंय सिस्टर यो! नो वरीज. तो स्टराईल कोयता घ्या..

बाजूच्या टेबलावरून शहाळं सोलायला वापरतात तसा कोयता उचलून बशरला देते. बशर शहाळं तासल्या-सारखा लिव्हरचा भाग तासून काढतो. मग ते पोटात ठेवत..

बशर अल असाद: धिस इज परफेक्ट! फिट झालंय. ग्रेट जाॅब!

स्टालिन: अरे ती स्प्लीन असते ती, ती बदल आधी. आय हर्ड, स्प्लीनमध्ये माणसाचा जीव असतो!

मुसोलिनी: वॉव! ज्ञानाचा महासागर! तू व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीचा ग्रॅज्युएट आहेस असं दिसतंय! तुझा भेजा घुटनेमें तसा जीव प्लीहेमध्ये!

बशर अल असाद: जनरल किम, स्किम मध्ये एक स्प्लीन घेऊन टाका. लिकिस्प्ली पॅकेजमध्ये घेतलं तर स्वस्तात होईल. एक

लिव्हर, एक किडनी, एक स्प्लीन.. थ्री इन वन पॅक. वर एक एक्स्ट्रा स्वादुपिंड फ्री!

किम यो जोंग: सर, मूत्रपिंड आणि स्वादुपिंड बदलले तर किम जोंग उनचा पिंड तर बदलणार नाही ना?

किम जोंग उन: यो! मी इकडे असा आहे म्हणून जास्तच चुरूचुरू बोलतेयस.. वन्स अ डिक्टेटर ऑलवेज अ डिक्टेटर! इव्हन इफ अ क्रो टचेस द पिंड! डॅड पण म्हणालेले, सुंभा बर्न्स पण पीळ डझन्ट! पण नाही, अमर होणाऱ्याच्या पिंडाला कावळा शिवण्याचाच प्रश्न उद्भवत नाही! डॉक्टर बशर तिच्याकडे लक्ष देऊ नका. बसवून टाका सगळे बशर पार्टस! सरकारी तिजोरीतून पैसे देऊन टाकेन. देश म्हणजे सरकार, सरकार म्हणजे मी.. देशाची तिजोरी म्हणजे सरकारी तिजोरी.. म्हणजे माझीच तिजोरी! सो, गो अहेड!

किम यो जोंग काही बोलण्याच्या आत शिपाई बॉक्स घेऊन येतो. त्यातून प्लीहा आणि स्वादुपिंड काढून ती बशरच्या हाती देते. ते आत ठेवत..

बशर अल असाद: परफेक्ट. बशर स्पेअर पार्ट्स म्हणजे प्रश्नच नाही! नाऊ लेट्स स्टिच धिज.

किम यो जोंग: यस्सर. माझा लाडका भाऊ आहे म्हणून रेशमाचा धागा आणू? रेशम की डोरी?

बशर अल असाद: आय अंडरस्टँड युवर सेंटिमेंट्स. पण तो चालणार नाही. सिस्टर यो, पतंगाचा मांजा घ्या. वुई नीड मजबूत धागा, नॉट अ कच्चा धागा!

यो पतंगाच्या मांज्याची फिरकी घेऊन उभी राहते. बशर त्यातून धागा ओढत मोठ्या दाभणात घालतो. मग टाके घालत..

किम यो जोंग: थ्यँक्स सर! वेळेवर टाका घातलात नाहीतर एकाच्या जागी आणखी नऊ घालावे लागले असते!

किम जोंग उन: यो.. टाक्यांचे घाव सोसल्याविना जोंगपण येत नाही! तुझी तोंडाची टकळी बंद कर! हातातली फिरकी धर नीट! उगाच माझी फिरकी घेत असते नेहमी.

बशर अल असाद: हे झालं आता! (जाहिरातीच्या सुरात) लिकिस्प्ली पॅकेज. बशर स्पेअर पार्ट्सची सवलत योजना. आजच फायदा घ्या आणि वर्षानुवर्षं जगा.. मृत्यूची नको भीती.. बीएसपीला थँक्स देऊ किती! टिंग टाँग.

टाकीचं झाकण बसवावं तसं पोटाचं झाकण वर ठेवतो.

किम जोंग उन: डन? ओव्हर?

बशर अल असाद: यस. आता छाती..नको! आय टेल्यू.. डिक्टेटर्स आर लकी! दे डोन्ट हॅव टू बॉदर अबाऊट दॅट हार्ट ॲटॅक! कां ते विचारा..

हिटलर: का?

बशर अल असाद: कारण दे से, त्यांना हार्टच नसतं! न रहेगा हार्ट न आएगा हार्टॲटॅक! तर छाती उघडण्याची गरज नाही..

हिटलर: पण ते फुसफुस..

मुसोलिनी: फुफ्फुस. लंग्ज..

बशर अल असाद: ते नको. ॲक्च्युअली फुफ्फुसाचा माल आज आला नाहीए. ब्लडी दॅट वर्कर, सायकलच्या पंपने फुफ्फुस फुगवताना जोर लावला त्याने तर थोडं फुटलंय! पण जनरल'स लंग्ज आर स्ट्राँग इनफ! सो द मेजर सर्जरी इज ओव्हर!

किम यो जोंग: पण सर, एखादा एक्स्ट्रा हात, पाय, डोळा, कान.. नाक.. गाडीत स्टेपनी असते तसं बसवता आलं तर!

स्टालिन: स्टेप नी! साला एक एक्स्ट्रा गुडघा बसव! स्टेप नी नि मग बघ द स्प्रिंग इन हिज स्टेप्स!

किम यो जोंग: झालंच तर एक एक्स्ट्रा डोकं पण बसवा! पण नको! दादा आहे तेच वापरतो कुठे? अँड वन मोअर थिंग! याचं तोंड तेवढं शिवून टाका डॉक्टर! फार वटवट करतो!

किम जोंग उन उठून उभा राहात..

किम जोंग उन: सिस्टर यो.. केस ओढून अय्य यो म्हणायला लावेन. माझा मेंदू बदल म्हणालेली. व्हॉट इज अ डिक्टेटर विदाऊट 'हिज' ब्रेन? इट्स ऑल इन हिज ब्रेन! नाहीतर ऑर्डिनरी माणूस आणि त्याच्यात काय फरक राहिल? थ्यँक्स डॉक्टर बशर अल असाद! आता मी तयार आहे. नवीन अवयव नवीन लाईफ! आता दहा वर्षांनी अवयवांचं सर्व्हिसिंग! दरवर्षी मेन्टेनन्स! वॉव! लाँग लिव्ह किम जोंग उन! लाँग लिव्ह मायसेल्फ! अमरत्वाकडे एक पाऊल! बशर अल असाद, धन्यवाद! मंडळ आभारी आहे! तू म्हणालास तसं.

सायन्स हॅज डन इट! सायन्सकडेच आहेत सगळी उत्तरं उत्तर कोरियाच्या उत्तरोत्तर उत्कर्षाची!

बशर अल असाद:(जाहिरातीच्या सुरात) बशर है तो मुमकिन है! बीएसपी बॉडी स्पेअर पार्टस्.. टिंग टाँग.

रंगमंचावर अंधार.. थोड्यावेळाने उजेड होतो तेव्हा पहिल्यासारखेच सगळे बसले आहेत. किम जोंग उन संमोहित झाल्यासारखा बसलेला. त्याला काही न ऐकू येत, न दिसत असा..

किम यो जोंग:(चुटकी वाजवत..) जागो डिक्टेटर जागो! कुठे हरवलास?

किम जोंग उन: (थोडासा जागा होत..) शास्त्र! शास्त्राकडेच असणार, नव्हे आहेत सारी उत्तरं. थँक्स डॉ बशर! (आजूबाजूला बघत पूर्ण भानावर येत..) ते स्वप्न होतं? डॉ बशर.. ते स्वप्न होतं?

बशर अल असाद: कुठलं कॉम्रेड?

किम जोंग उन: नवीन अवयव प्रत्यारोपण. यू गेव्ह मी द डील.. लिकिस्प्ली डिल!

बशर अल असाद: डील? आय डोन्ट डील विथ ऑर्गन ट्रान्सप्लांट! पण यस, शक्य आहे ते नजीकच्या भविष्यकाळात. किंवा जनुकीय रचना बदलून माणसाचं आयुष्य वाढवणं.. सायन्स होल्ड्स द की! पण आपण ती वापरणार कुठल्या कुलुपासाठी हा प्रश्न आहे! पण आपल्यासारख्या हुकुमशहांसाठी शास्त्रं हा एक मोठाच आधार आहे.

किम जोंग उन: बशर अल असाद म्हणाला तसं. शास्त्रीय प्रगतीतूनच अमरत्वाकडे वाटचाल होणार. शास्त्र पुढे जाणार आणि मी अमर होणार! होणारच! तानाशाह अमर रहे! तानाशाही पण अमर रहे!

सगळे: तानाशाहीचा विजय असो! लाँग लिव्ह तानाशाही! लोकशाही मुर्दाबाद! डाऊन विथ डेमॉक्रसी! नंबर वन हिप्पाॅक्रसी.. डेमॉक्रसी डेमॉक्रसी!

स्टालिन: किम जोंग उन, सायन्स! एक्स्प्लाॅइट द सायन्स अँड गेट स्पाॅइल्ट! अरे, सिंपल! आण चारदोन हुशार शास्त्रज्ञ पळवून जगभरातून नि ठेव डोक्यावर मशीनगन नि म्हण.. करा लेको संशोधन. कसा अमर बनत नाहीस तेच बघतो म्हणावं. अरे, आम्ही गेलो पण तू तरी अमर हो! नाहीतर काय उपयोग त्या शास्त्र नि शास्त्रज्ञांचा? लोणचं घालायचं त्यांचं?

हिटलर: किम जोंग उन, तू एकटाच आहेस आता जो या बोकाळू पाहणाऱ्या लोकशाहीची वाट रोखू शकतोस. तूच आम्हा हुकुमशहांची आन बान आणि शान! तू प्रयत्न सुरू ठेव टू बी इम्माॅर्टल देन एव्हरीथिंग एल्स विल बी इम्मटेरियल! गो फॉर इट. स्वत:साठी नाही तर हुकुमशाहीसाठी! नाहीतर लोकशाहीचा बुजबुजाट होईल जगभर आणि आपल्यासारख्या हुकुमशहांना खाली पाहण्याची वेळ येईल. आणि लोकशाहीचे पोवाडे गाणाऱ्यांनो! लोकशाही म्हणजे काय? लोकांनी लोकांचे लोकांसाठी चालवलेले राज्य? हा काय चावटपणा? लोकांचा राज्य चालवण्याशी संबंध तो काय? सामान्य जनता ती, मुकी बिचारी कुणी ही हाका! तिकडे त्या मुक्या बिचाऱ्यांचा मुका घेत बसावं नि आंजारून गोंजारून विचारावं, करू का रे तुझ्यावर राज्य? तुझी इच्छा असेल तर करतो बापडा! अरे हॅट! असला फालतुक चावटपणा खपवून घ्यायचा आणि त्याला लोकशाही म्हणून डोक्यावर घेऊन नाचायचं? रूलर कसा हवा? त्याच्या एका हुकुमावर प्रजा थै थै नाचायला हवी. हुकुम नाही मानला.. डायरेक्ट रवानगी टू द गॉड. डिफेक्टिव्ह प्रॉडक्ट. रिटर्न्ड बॅक टू द सेंडर! हुकुमशहाला असं कठोर व्हावंच लागतं ते देशाच्या उद्धारासाठी, कल्याणासाठी. लोकांना काय कळतंय त्यातलं? सामान्य प्रजा असते ती आदेश पाळण्यासाठी. लोकशाहीची

नसती थेरं देशाचा विनाश करतील नि आपण नुसतं बघत बसावं? देशप्रेम वगैरे काही आहे की नाही? किम जोंग उन, अमर होण्याचे प्रयत्न कर. त्या प्रयत्नात तू दीडशे वर्षं तरी जगशील. तोवर शास्त्र अजून पुढे गेलेलं असेल. नि अमरत्वाचा फॉर्म्युला मिळाला असेल! तसं झालं तर तुला अडवणारा कोण असणार आहे? हुकुमशाहीचा झेंडा दुनियेभरात फडकवणारा तू किम जोंग उन.. लाँग लिव्ह किम जोंग उन!

किम जोंग उन: ॲडॉल्फजी, लोकशाही आणि हुकुमशाहीबद्दलचं तुमचं हे मुलभूत चिंतन! तुमच्या एकेका शब्दातून हुकुमशाहीबद्दलचा कळवळा दिसतोय.

बशर अल असाद: जनरल किम, ज्याच्या हाती हुकुमशाहीची दोरी, तो जगाते उद्धारी! जगाच्या कल्याणासाठी अमरत्वासाठी प्रयत्न करायलाच हवेत!

स्टालिन: यस डियर! मी म्हणतो, की ते मोठ्या तोंडाने म्हणतात, लोकशाहीमुळे मिळतात तीन गोष्टी.. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता! पण या तिन्ही बाबतीत आपणच हुकुमशहा ग्रेट!

मुसोलिनी: दॅट्स द बेसिक! स्वातंत्र्य! आपल्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे की नाही? सत्ताधीशाला पूर्ण मोकळे रान, म्हणजेच संपूर्ण

स्वातंत्र्य! आहे कुणाला असं स्वातंत्र्य लोकशाहीत? घाबरट लेकाचे! म्हणे लोकांना घाबरतात!

माओ: आणि समता! ऑल मेन आर इक्वल आणि सम आर मोअर इक्वल! आणि आपण नाही का सर्व जनतेला समान लेखत? कुणीही विरोध केला तर नाही बघत हा काळा का गोरा! जस्ट शूट ॲट साइट. मग त्यात पार्श्यालिटी नाही. आणि सर्वांना एकच शिक्षा! यमसदनी पर्यटन! त्यात बदल नाही! अजून काय असते समता?

फ्रँको: आणि बंधुता! अरे फुटबॉलवाला मी! त्यात वेळ मिळाला की चार दोन डोकी उडवायची. वाईट वाटायचं. आपलेच बंधुबांधव जाताना पाहून वाईट वाटायचं. पण कर्तव्य पहिलं! भावना नंतर. एकेका मरणाऱ्याला पाहून आपला बंधू गेला म्हणून वाईट वाटणं याहून बंधुता अजून काय असते?

स्टालिन: आणि म्हणे मानवी अधिकार! यापेक्षा हंबग दुसरं काही नसेल! अधिकार? अरे, सर्वांना अधिकार समानच असतील तर त्या अधिकारांना काय अर्थ राहिला? त्यांचं काय लोणचं घालायचं?

इडी अमीन: माय डिअर फ्रेंड ओमर अल बशीर वुड हॅव टोल्ड यू.. तिकडे सुदानमध्ये बनतं खास लोणचं.. कसलं ही! कीडेमुंगी झुरळं.. तसं. मानवी अधिकारांचं लोणचं!

गडाफी: अरे इडी, बी सिरियस! त्या सुदानी लोणच्याचंच घाल लोणचं! मानवी अधिकार म्हणे! अरे, आपण काय माणसं नाही? आपल्या अधिकारांचं काय?

सद्दाम हुसेन: राईट! इव्हन दोज राईट ब्रदर्स, ते विमान उडवणारे.. वुड हॅव सेड दॅट! राईट!

फ्रँको: यू आर राईट सद्दाम अँड गड्डू. अरे ठोका शड्डू! नि रहा उभे लोकशाहीच्या नावानं शंख करत..

इडी अमीन: आय विल डू द्याट.. शंख .. लोकशाहीच्या बैलाला.. ढोल!

किम जोंग उन: आता जरा बरं वाटतंय! जिवात जीव आला. तुम्ही लोकं आहात म्हणून बरंय, नाहीतर जगभर पसरलेल्या लोकशाहीच्या नावानं बोंबा मारणाऱ्यांत जीव गुदमरतो माझा.

स्टालिन: किम जोंग उन, आय कॅन अंडरस्टँड.

स्टालिन: पण हे समजू नका की दुनियाभरचे बोलघेवडे सत्ताधीश खरोखरच्या लोकशाहीचाच आग्रह धरताहेत. अरे, सत्ता हाती येईतोवर लोकशाही, नंतर आडून आडून हुकुमशाही. असा कोण खरा सत्ताधीश असेल ज्याला वाटत नाही की त्याच्याच हाती सारी सूत्रे असावीत नि सगळी ताकद

एकवटलेली असावी? पैसा आणि सत्ता. एकातून दुसरी गोष्ट मिळायलाच हवी. दोघांचाही कैफ मोठा. तेव्हा लोकशाहीतून जरी सत्ता हाती आली तरी स्वप्न पडतात ठोकशाहीची! पण मग मी म्हणतो मिळमिळीत पडद्याआडच्या हुकुमशाहीपेक्षा ढळढळीत उघड हुकुमशाहीच बेस्ट! उगाच ताकाला जायचं नि भांडं लपवायचं!

पिनोचेट: (डुलकी देता देता एकाएकी जागा होत..) काय? ताक? दे बाबा जरासं. च्यामारी, तिकडे नरकात ताक नावाचं पातळ पांढरं पाणी देतात रे. आत्म्याचं वजन मोजता आलं असतं तर कळलं असतं किती वजन घटलंय माझं.. चिकन मटणाचं तर नाव नाही. गोडधोड? विचारू नका! मी म्हणतो, साला जगायचं तरी कशासाठी?

फ्रँको: पिनोशेट, जगण्याची बात करताय? मरणोपरान्त जगणं? पोस्टमॉर्टेम लाइफ? झोपा जरा निवांत, डुलक्या देत डोललात तरी चालेल. आपल्याला इथे कोण बघतंय? मग उठा, तोवर येतंयच चिली टाकून.. ताक!

किम जोंग उन: नो लेग पुलिंग माय फ्रेंड्स! नो लेग पुलिंग. आय कॅन अंडरस्टँड द नरकयातना यू हॅव टू अंडरगो.. पण करणार काय?

किम यो जोंग: नरकयातनाओंसे परेशान.. हमारे पास है समाधान! उत्तर कोरियात या आणि फरक बघा! नरकयातना सुसह्य करण्याचा सोपा मार्ग उत्तर कोरियातून जातो!

किम जोंग उन: यू नेल्ड इट यो! यू आर द रियल ब्रँड अँबॅसडर ऑफ नॉर्थ कोरिया सिस!

किम यो जोंग: थँक्स ब्रो.

किम जोंग उन: फ्रेंड्स, फोरफादर्स अँड (किम जोंग इल कडे पाहात) वन फादर, माझी सूचना आहे. लेट्स फॉर्म्युलेट अ डिक्टेटर्स मॅनिफेस्टो. प्रत्येकाने आपापला एकेक पॉइंट सांगितला की मॅनिफेस्टो तयार!

हिटलर: ग्रेट आयडिया!

किम जोंग उन: मला वाटतं प्रत्येक जणाकडे असणार शहाणपणाचे मोती म्हणजे पर्ल्स ऑफ विज्डम! द ग्रेट डिक्टेटर आणि आपणा सर्वांचे अनभिषिक्त लीडर द ग्रेट ॲडॉल्फजी हिटलरजी यांनी या ग्रेट आयडियेची सुरूवात करावी..

हिटलर: ही कल्पना चांगली आहे. मी सर्वप्रथम सांगेन ते हे की, प्रत्येक, म्हणजे कोणत्याही सत्ताधीशास हुकुमशहा बनण्याचा मुलभूत अधिकार आहे आणि असावा, 'राईट टू डिक्टेटरशिप.' सत्ताधारी म्हणजेच हुकूम सोडण्याचा

सर्वाधिकार असलेला. त्याचे सर्वाधिकार अबाधित असावेत. मग तो कोणत्याही पद्धतीने सत्ताधीश झालेला असो.

स्टालिन: त्या अधिकारांच्या रक्षणार्थ, जो कोणी हुकुमांच्या अंमलबजावणीत आडवा येईल त्याला आडवा करण्यासाठी सत्ताधीशास 'राइट टू टॉर्चर' असायलाच हवा.

मुसोलिनी: त्याच बरोबर त्याला 'राईट नॉट टू बी क्वेश्चन्ड' असायलाच हवा. म्हणजे त्याला प्रश्न विचारण्याचा अधिकार कोणालाही असू नये. हुकुमशहाचा हुकूम बिनातक्रार मानला जाणे हाच नियम असावयास हवा.

इडी अमीन: हुकूम न मानणाऱ्यास त्याच्या निर्मात्याकडे म्हणजे यमसदनास विनाविलंब व विनातक्रार पाठवण्याचा पदसिद्ध अधिकार 'राइट टू सेंडॉफ डू द गॉड' असायलाच हवा.

गडाफी: हुकुमशहा म्हणजे 'हम करे सो कायदा' नसून तो 'हुकुमशहा म्हणजेच कायदा' हे मान्य केले गेलेच पाहिजे. हुकुमशहा हा राजा! तेव्हा लोकसेवक, नगरसेवक, अमुक सेवक, तमुक सेवक असली मानभावी पदनामकरण पद्धती तातडीने बंद करण्यात यावी. हुकुमशहा हा नामधारी सुद्धा सेवक असू शकत नाही. सेवक हा शब्दच सगळीकडून काढून टाकण्यात यावा. त्याऐवजी मालक आणि गुलाम हेच शब्द वापरात यावेत.

माओ: 'लाँग लिव्ह डिक्टेटर' योजने अंतर्गत एकदा सत्ताधीश झालेल्या हुकुमशहास त्या पदावर तहहयात राहणे व आपली हयात वाढवण्याचा हक्क असायलाच हवा. आमचा क्षी याबाबतीत प्रयत्न करतोय चांगलाच. आय वुड से, बक अप अँड किप इट अप!

सद्दाम हुसेन: हुकुमशहाच्या कोणत्याही कृतीच्या बातम्या त्याच्याकडून आदेश आल्याखेरीज छापण्यात येऊ नयेत. बातमी घडवणाराच त्या बातमीचा मालक असतो. हुकुमशाही राज्यात सारे काही त्याच्या कृपेने होत असेल तर बातमीदारीही त्याच्याच मर्जीनुसार व्हावयास हवी!

बशर अल असाद: सर्वत्र 'नि:प्रश्न योजना' अंमलात यावी. त्यानुसार प्रश्न विचारण्यास संपूर्ण बंदी असावी. तसा बदल शिक्षण पद्धतीतही करावा. अर्थात जनतेस शिक्षण द्यायचे असले तरच.

पोल पॉट: हुकुमशहाचे फोटो सर्व सरकारी, निमसरकारी खाजगी कचेऱ्यांत तसेच विविध सर्टिफिकेट्स, दस्तऐवज यांवर छापणे बंधनकारक असावे. यावेत.

फ्रँको: 'जगाच्या कल्याणा डिक्टेटरांच्या विभूती' असल्याने देशभर त्याला प्रभात वंदना दिली गेलीच पाहिजे. हुकुमशहाच्या स्तुती स्तोत्रांचे पठण शाळाकॉलेजांतून दररोज केले जावे.

आज्ञापालन आणि नागरिकाची परमकर्तव्ये दररोज सकाळी देशभर ऐकविण्यात यावी. 'साहित्यकला देशभक्ती योजना' अंतर्गत देशातील लेखक कवी मंडळीस अशा कथाकविता इत्यादी लिहायची सक्ती करण्यात यावी.

किम जोंग इल: हुकुमशहाचा हुकूम जनतेने निमूट पाळावा म्हणून 'किम्स एन.के. जनशिक्षण मोहीम' चालवण्यात यावी. कोणत्याही वाहनावर पुढे व मागे हुकुमशहाचा फोटो हारासह असणे बंधनकारक व्हावे. मधूनमधून त्याच्यासमोर हात न जोडल्यास कारवाई करण्यात यावी. ही अट कोणावर कारवाई करण्यास कारण सापडत नसेल तेव्हा सुद्धा उपयोगी पडेल.

पिनोचेट: आयॅम फुल्ली अवेक धिस टाइम.. आय वुड से, नावात काय आहे म्हणणाऱ्यांच्या जाळ्यात अडकू नका! दूर तिकडे इंड्या नामक देशाने तर इतकी प्रगती केलीय म्हणे की आता फक्त वेगवेगळ्या शहरांची, गावांची, योजनांची नावेच बदलणं बाकी आहे. त्यापासून बोध घेतलाच पाहिजे. मी म्हणतो हुकुमशहाला हुकुमशहा न म्हणता ससकु म्हणजे सर्वसत्तांकुशाधिकारी म्हणण्यात यावे!

किम जोंग उन: यस..यस. थ्यँक्स टू ऑल ऑफ यू! धिस विल बी अवर मॅनिफेस्टो. द मॅनिफेस्टो ऑफ द

सर्वसत्तांकुशाधिकारीज ऑफ द वर्ल्ड, हू विल रूल द युनिव्हर्स! आय हॅव टू ॲप्रिशिएट, यू ऑल वेअर सेल्फ मेड. पण मी आश्वासन देतो की मी तुमच्याकडून शिकून हुकुमशाहीच्या दुनियेत मोठं नाव करीन.. मला ते गाणं गावंस वाटतंय..

किम यो जोंग: ब्रदर तू आणि गाणं?

किम जोंग उन: अगं एखाद्या खास प्रसंगी काय हरकत आहे?

पिनोचेट: होऊन जाऊ दे दोन ओळी किम जोंग उन..

पोल पॉट: यस. तेवढंच मनोरंजन! अरे त्या नरकात एकेकाचा भसाडा आवाज ऐकून वैतागलोय.

किम यो जोंग: पोल पॉट जी.. त्यातून मात्र सुटका नाही. उनचा आवाज इज भसाडेस्ट इन द वर्ल्ड. अगदी वर तिकडे जे कुणी असतील ते सुद्धा धरून!

किम जोंग उन: असेल.. पण फिलिंग्स महत्वाच्या यो!

किम यो जोंग: अय्य..यो! द डिक्टेटर बिलिव्हिंग इन किलिंग्स, नाऊ विथ फिलिंग्स?

किम जोंग उन: आता गप! नाहीतर डॅडना नाव सांगेन. मला जे गाणं म्हणावंस वाटतं ते हे.. (बेसूर गायला लागतो..) पापा कहते

थे बडा नाम करेगा.. बेटा हमारा ऐसा काम करेगा.. और ये तो हर कोई जाने के मेरी मंजिल है कहाँ..

पोल पॉट: वा! अँड यो आणि उन.. बोथ ऑफ यू आर करेक्ट! उन म्हणतो ते गाणं करेक्ट आणि तू त्याच्या गाण्याबद्दल म्हटलेलंस ते ही..

किंम जोंग उन: थ्यँक्स पोल पॉटजी. आणि थ्यांक्स टू माय डिअर फेलो तानाशाह्ज. कुणीतरी मागे म्हटलं होतं, वादे वादे जायते तत्वबोध:. अनुभवासारखा गुरू नाही. तुम्ही सारेच अनुभवी जण माझे आदर्श आहात. थ्यँक्यू ऑल. तुम्ही दाखवलेल्या मार्गावर मी चालत होतो, आहे आणि राहीन.. फॉर मेनी मोअर इयर्स.. द टॉर्चबेअरर ऑफ टॉर्चर! लाँग लिव्ह डिक्टेटरशिप. डेमॉक्रसी मुर्दाबाद.. ब्लडी साऊथ कोरिया..

बेल दाबून शिपायाला आत बोलावतो.. एक शिपाई आत येतो. सलाम करतो नि वाकून उभा राहतो.

किम जोंग उन: सोल्जर.. जस्ट शूट सम ऑफ द पीपल वेटिंग आउटसाइड. धिस इज ॲन ऑर्डर. होऊन जाऊ दे सेलिब्रेशन.. तानाशाही अमर रहे.. तानाशाह भी अमर रहे..

बाहेरून गोळ्या झाडल्याचे आवाज येतात. पाठोपाठ कुणी मरताना किंकाळ्यांचे.

सर्व: लोकशाही मुर्दाबाद! डाऊन विथ डेमॉक्रसी..

लाँग लिव्ह तानाशाही.. चकचकाचक जगमग जगमग.. हू आर वुई.. तानाशाह्ज.. हू आर वुई.. तानाशाह्ज!

हिटलर (हातातील घड्याळ पाहात..): अटेन्शन डिअर ऑल सोल्स, द व्हिजिटिंग फॅकल्टी टू किम्स' टॉर्चर फॅक्टरी, अवर टाइम इज उप! आपला वेळ संपला.

फ्रँको: मतलब? अपना टाइम जाएगा?

हिटलर: होय! अरे तिकडे कियम नडक आहेत.. आय मीन नियम कडक आहेत. आजचा एक दिवस फक्त इकडे पृथ्वीवर यायची सूट मिळते. वुई हॅव टू बी बॅक ऑन टाइम.

स्टालिन: सो लेट्स गो बॅक.

मुसोलिनी: दुसरा काही ऑप्शन आहे? हरी अप..

किम जोंग इल: नो वरीज डिअर फ्रेंड्स, मेरा बेटा किम जोंग उन है ना! तो आपलं राज्य पुढे चालवेल. लेट्स डिस्पर्स बिफोर इट्स लेट! आणि तिकडच्या शिक्षा.. इकडल्यापेक्षा भयानक! म्हणजे एनीबडी कॅन इमॅजिन! रादर कॅन नॉट इमॅजिन!

किम जोंग उन: कॅन यू अपडेट डॅड? म्हणजे इकडेच लोकांना नरकवासाचा फिल देता येईल..

किम जोंग इल: अरे, आमचा पॅरोलवरचा टाइम संपला.. वुई हॅव टू बी बॅक.. नो अदर ऑप्शन.. बट आय कॅन से प्राऊडली, यू आर व्हेरी नियर टू इट सन! गुडबाय.. किम्स..

क्षणभर काळोख. परत उजेड होतो तेव्हा किम जोंग उन कुठेतरी नजर लावून स्तब्ध बसलेला आहे. किम यो जोंग बाजूला उभी आहे. बाकी स्टेजवर अन्य कुणी नाही.

किम यो जोंग: (उन कडे पाहाते..) दादा ते गेले ना.. (किम जोंग उनचं लक्ष नाही हे पाहात..) अरे दादा, ते गेले ना! तुझं ध्यान

नाही इकडे? पण खरं सांगू.. तुझं ध्यान अगदीच ध्यान दिसतंय! ओ गॉड! आय शुडन्ट से धिस! ॲडॉल्फनंतरच्या द ग्रेट डिक्टेटराला चिडवणं नि डिवचणं महागात पडेल! आयॅम प्राऊड ऑफ यू. ते सगळे एकीकडे नि तू एकीकडे. सर्वांनी म्हणायलाच हवं.. तानाशाह कैसा हो? किम जोंग उन जैसा हो!

किम जोंग उन: मी स्वप्नात तर नाही ना? यो.. मला चिमटा काढ..

किम यो जोंग: (चिमटा काढत..) काढते ना! असला चान्स कोण सोडेल?

किम जोंग उन: अगं इतक्या जोरात? असलं काही करायला मी काय तुला सामान्य जनतेतील एक वाटतो की काय? पण म्हणजे मी स्वप्नात नाही. कारण तुला मी स्वप्नातदेखील चिमटा काढू देणार नाही! पण हे जे काही झाले.. माझा विश्वासच बसत नाही. जगभरचे हुकुमशहा प्रत्यक्ष येतात नि असलं मार्गदर्शन.. म्हणजे मला वाटतं प्रत्यक्ष ईश्वरी आशीर्वाद जणू! उत्तर कोरियात माझी पोलादी पकड मजबूत होतेय ती अजून व्हावयास हवी. नाहीतर ते काव्य साहित्य विनोदवाले दहशतवादी फोफावतील. अगदी एखाद दुसरा असला तरी काय झाले? ती विषवल्ली मुळापासून उखडायला हवी.. हुकुमशाही हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी

मिळवणारच! यो, कामाला लाव सगळ्यांना.. लाव कामाला. आज आता ताबडतोब..

किम यो जोंग: यस ब्रदर..

किम जोंग उन: चारी दिशांना सैनिक पाठव. प्रजेतील एकेकाचं नाक तपासून पहा. वाकड्या नाकाचा एक ही कोणी शिल्लक राहायला नको. टेक इमिजिएट ॲक्शन. धिस इज अ नॅशनल इमर्जन्सी. न राहील वाकडं नाक.. तरच येईल पाठीला बाक! वाकडं नाकवाले आपला हुकूम बघून नाक वाकडं करत असतील तर कळू देत त्याना, ते आपलं काहीच वाकडं करू शकणार नाहीत! आय नो नाऊ, आपल्या हुकुमांना नाकं मुरडून मुरडूनच ती वाकडी झाली असणार! हिटलरजी इज ग्रेट! त्यांनी बरोबर शोधून काढलं! तसे जगभर कित्येक आहेत डिक्टेटर्स. त्यांच्यापैकी एक नव्हे तर न्युमरो उनो बनायला हवं यु नो! आता उरतील फक्त माझ्यासमोर वाकणारे. पाठीला बाक आलेले, वाकून वाकून! ते म्हणतात ना, दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए! म्हणजे परत तेच.. मी झुकानेवाला.. कुंभार, बाकी सारी प्रजा गाढव. मी कुंभार असताना गाढवांना तोटा नाही! ऑल रूलर्स टू नोट! गाढवांना तोटा नाही! नाहीच! होलसेल गाढवीकरणाच्या योजना आखायला घेऊ! त्यात कोणी नाकं मुरडली तर? तर यो, स्टार्ट द ॲक्शन. होऊन जाऊ दे हिंसा!

किम यो जोंग: यस ब्रो! आपले सैनिक निघालेत या मोहिमेवर. क्विक डिसिजन, क्विकर ॲक्शन आणि क्विकेस्ट रिझल्ट्स! आयॅम प्राऊड ऑफ यू जनरल किम जोंग उन!

किम जोंग उन: आपले सर्वोत्तम गुप्तचर आणि सैनिक यांना आदेश द्या. देश वा विदेश, आकाश किंवा पाताळ, पृथ्वी किंवा परग्रह, चंद्र किंवा सूर्य.. कोठेही असोत, सर्वोत्तम शास्त्रज्ञांचा शोध घ्या. कुठेतरी नॅप घेत असतील, त्यांना किडनॅप करा. ही देखील राष्ट्रीय इमर्जन्सीच आहे. तसे शास्त्रज्ञ सापडले की अमरत्वाचा फॉर्म्युला मिळेतोवर त्यांच्या डोक्यावर टांगती तलवार राहिल.. आणि तो फॉर्म्युला मिळाला की.. ती तलवार टांगती राहणार नाही. थेट खाली येईल.. त्यांच्याच शिरच्छेदासाठी.

किम यो जोंग: ब्रो, तुला वाटतं असं काही होईल?

किम जोंग उन: का? टांगती तलवार खाली येऊन त्यांच्या डोक्यावर पडणार यात शंका वाटते तुला? अगं, शास्त्रावर विश्वास ठेव! न्यूटनची गुरूत्वाकर्षण बनवले ते का उगाच?

किम यो जोंग: त्याबद्दल नाही ब्रो. आय कान्ट डाऊट सायन्स. अँड युवर ब्युटॅलिटी टू! पण तो अमरत्वाचा फॉर्म्युला मिळेल?

किम जोंग उन: अर्थातच. सद्दाम हुसेन 'सायन्स इज अ स्कॅम' म्हणत असेल पण मला वाटतं सायन्स इज द अल्टिमेट सेव्हियर

आणि द ओन्ली सेव्हियर. शास्त्राचे शोध लागतातच जगावर कंट्रोल करण्यासाठी. दुधारी तलवार ती! तो फॉर्म्युला मिळेल.. मिळेलच! मी अमर होईन. होईनच. मी नॉर्थ कोरियाचा सर्वेसर्वा. अनंत काळापर्यंत. आज नॉर्थ कोरिया. उद्या आजूबाजूचे देश.. परवा अजून पुढे.. नंतर संपूर्ण जग!

मग सद्दाम हुसेन, मी हसेन सर्वांवर.. हा हा हा हा!

हसण्यास बंदी आणली मी देशभर, कारण

जिथे भय नाही तिथे हसू आहे आणि जिथे हसणे आहे तिथे भीती नाही! नॉर्थ कोरिया म्हणजे भय भीती.. हंसना मना है! हा हा हा हा!

आणि एक मृत्यू सोडला तर एका हुकुमशहाला भय कसलं? त्या मृत्युवरच विजय मिळवणार मी.. मृत्युंजय किम जोंग उन!

आणि तसं नाहीच झालं तरी?

मी कार्यसम्राट, कोरियन हृदयसम्राट, उत्तर कोरियाभूषण, द गॉड ऑफ कोरिया जनरल किम जोंग उन.. आपल्या कार्यानं अमर होणार.

हा हा हा हा!

मी द इममॉर्टल ग्रेट डिक्टेटर!

माझी प्रजा गाढवासारखी माझ्यामागे असेल तर माझ्या कुंभारपणाला मरण नाही. मी जनरल किम जोंग उन, होलसेल गाढवं निपजवण्याची व्यवस्था करणार! विचारांची जळमटं डोक्यात न बनल्यानं खुसपटं न काढणारी गाढवं! माझ्या मार्गात डोकं चालवणारं नि खुपसणारं कुणी आलंच नाही तर.. मला धोका नाही. तहहयात धोका नाही. तोवर मी.. मीच सत्तासिंहासनावर विराजमान, द इटर्नल प्रसिडेंट!

मी आहे, राहणार, नामचीन हुकुमशहा!

मी हुकुमशहा! तानाशाह!

गाढव प्रजा और गाढव बनती रहे!

ते सर्व म्हणाले तसंच,

लाँग लिव्ह डिक्टेटरशिप!

लाँग लिव्ह किम जोंग उन!

गाढवांचा विजय असो!

गाढवीकरण झिंदाबाद!

तानाशाह अमर रहे ..

और तानाशाही भी अमर रहे!

डॉ. नितीन मोरे यांची ६४ प्रकाशित पुस्तके












डॉ. नितीन मोरे
२अंकी बोलनाट्य

लाडेबा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास

प्रिझन
ब्रेक


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक


डॉ. नितीन मोरे
तिसऱ्या घंटेची गंमत


डॉ. नितीन मोरे
खोल अंक प्रेमाचे


एका डॉक्टरची कोविडकथा


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे
बोललो तर बोलाल की बोलतो

चक्रमादित्य भाग १ ते ५











डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0

डॉ. नितीन मोरे
HOSTEL-1

डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी

डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
ढकू
आणि
ढाकू


डॉ. नितीन मोरे
आहे
हे
असं आहे!


डॉ. नितीन मोरे
नटवर्य






डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि


डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे
भ्रष्टाचार


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाकाबंदी
सांगतो ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे


अ..ब..म..


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी-2
काही पाने


डॉ. नितीन मोरे
मी मेल्यानिया बोलते


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी-3

डॉ. नितीन मोरे
'इका' गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी
काही पाने


डॉ. नितीन मोरे
ऐसे अक्षरे

Jackson...

सुलट उलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!


मुक्ताफळांचा
मळा 2
डॉ. तिलीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष
डॉ. नितीन मोरे यांचे हे पासष्टावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मन:पूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना

विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१६), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६५ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६५ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी

(१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण३३)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१९),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(२३ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१७)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडॅ, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर

सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं “ई”यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)